गर्मी में भी सर्दी का मजा
COMPRO Systems & Services
Symphony DAIKIN BLUE STAR VOLTAS Carrier
कुलर, ए.सी., फ्रीज
सुलभ हप्त्यावर उपलब्ध 0% फायनान्स
HDB FINANCIAL SERVICES BAJAJ FINSERV
• वॉशिंग मशिन • एलईडी टीव्ही • होमथिएटर • मोबाईल • होम अप्लायन्सेस
अंबर प्लाझा, एचडीएफसी बँके जवळ, स्टेशनरोड, अ.नगर. मो. ९३२५१०३०५०






# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, बुधवार दि. १४.०५.२०२५ | अंक नं. ३७ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020



SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स ॲण्ड मार्बल इंडस्ट्रिज

फक्त फायदाच फायदा !
खरेदीवर पॉइंट पॉइंट्सवर गिफ्ट
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

10वी तील यशस्वी विद्यार्थ्यांसाठी
गोल्डन ऑफर
चेन व अंगठी खरेदीवर मिळवा
आपल्याला मिळालेल्या टक्केवारीएवढी
मजुरीत सूट*
योजना 16 मे 2025 पर्यंत लागू
योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी आपल्या मुळ मार्कशीटची झेरॉक्स प्रत स्वतः घेवून येणे आवश्यक.
चंदुकाका ज्वेल्स
सोनेरी नातं..
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02


# माळीवाडा येथील शंकर सावली मठात भरदिवसा चोरी; चांदीचे दागिने लंपास

## घटना सीसीटीव्हीत कैद

नगर - शहरातील माळीवाडा येथील ब्राह्मण गल्लीमध्ये असलेल्या शंकर सावली मठ येथील बाबांच्या मूर्तीचे गळ्यातील व पादुका जवळील चांदीचे दागिने व रुद्राक्षाची माळ असा १३ हजार रुपये किमतीचा ऐवज अज्ञात चोरट्याने चोरून नेला. ही घटना १३ मे रोजी सकाळी १० ते रात्री १०.३० वाजल्याच्या दरम्यान घडली.

याबाबत मंदिराचे पुजारी कमलेश लक्ष्मण जंजाळे (वय २६, रा. ब्राह्मण गल्ली, माळीवाडा) यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे त्यांचे हॉटेल व्यवसाय सांभाळून शंकर सावली मठ येथे पुजारी म्हणून काम पाहतात. १३ मे रोजी सकाळी ७ वाजता फिर्यादी यांनी मठ उघडून पूजा केली. त्यावेळी मंदिरातील शंकर महाराज यांचे मूर्तीवरील दागिने सुव्यवस्थित होते. त्यानंतर फिर्यादी हे रात्री १०.३० वाजता निद्रा आरती करण्यासाठी मठामध्ये पुन्हा आले असता त्यांना बाबांच्या मूर्तीच्या गळ्यातील चार हजार रुपये किमतीची चांदीची चेन, २ हजार ५०० रुपये किमतीचा चांदीचा तुळजाभवानीचा टाक, बाबांच्या पादुका जवळील ६ हजार ५०० रुपये किमतीची रुद्राक्ष मण्याची चांदीची माळ असा १३ हजार रुपये किमतीचा ऐवज दिसून आला नाही.

त्यावेळी फिर्यादी यांनी मंदिरातील सीसीटीव्ही फुटेजची पाहणी केली असता त्यात सकाळी साडेदहा ते पावणे अकरा वाजण्याच्या दरम्यान एक स्काय ब्ल्यू कलरचा फुल बाह्याचा शर्ट घातलेला व काळी फॉर्मल पॅन्ट घातलेला तसेच कपाळावर केसरी रंगाचा टिळा लावलेला अनोळखी इसम हा चोरी करीत असताना दिसून आला.

याबाबत कमलेश जंजाळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून कोतवाली पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध भा. न्या. सं. कलम ३०५ प्रमाणे चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

## आरोपीला माळीवाडा बसस्थानवर पकडले

गुन्हा दाखल होताच पोनि. प्रताप दराडे यांनी गुन्हे शोध पथकास आरोपीचा शोध घेण्यासाठी आदेश दिले. त्यानुसार पथक तांत्रिक विश्लेषणाद्वारे तसेच गोपनीय माहिती काढत असताना त्यांना संशयित आरोपी माळीवाडा बसस्थानकावर चोरी करण्याच्या उद्देशान आला असल्याची माहिती मिळाली. पथकाने तातडीने माळीवाडा बसस्थानकात जावून संशित रुपेश दादासाहेब खोजे (वय ३४, रा.कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी) यास पकडले. त्याच्याकडे चौकशी केली असता त्याने सुरुवातीला उडवाउडवीची उत्तरे दिली. मात्र कसून चौकशी केल्यावर त्याने चोरीची कबुली देत चोरलेले १३ हजार रुपये किंमतीचे चांदीचे दागिने काढून दिले.

ही कारवाई पोनि. प्रताप दराडे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकाच्या स.पो.नि. योगिता कोकाटे, महिला अंमलदार रोहिणी दरंदले तसेच राजेंद्र औटी, संदीप पितळे, विशाल दळवी, दीपक रोहोकले, तानाजी पवार, सूरज कदम, शिरीष तरटे, दत्तात्रय कोतकर, राम हंडाळ, सचिन लोळगे, सोमनाथ केकाण, महेश पवार, सोमनाथ राऊत, प्रतिभा नागरे यांच्या पथकाने केली आहे. *(छायाचित्र पान २ वर)*


वजनावर अगरबत्ती
मसाला, सफेद,काळीकाडी होलसेल २०० ग्रॅम व २५० ग्रॅम पॅकिंगमध्ये उपलब्ध
केवल अगरबत्ती
हॉटेल रसरंग समोर, आडत बाजार, अ.नगर

१ वर्षाच्या बाळाला सांभाळण्यासाठी बाई/मुलगी पाहिजे
सारसनगर येथे सावी हॉस्पिटलजवळ (वय १८ ते ४५)
वेळ : सकाळी ९ ते संध्या. ९
8888576576

Mount Litera Zee School
NURTURING POTENTIAL, UNLEASHING BRILLIANCE.
CBSE AFFILIATION NO 1130870
Admissions open 2025-26
Daund Road, Arangaon, Ahilyanagar 414006
नर्सरी ते दहावी पर्यंत दर्जेदार शिक्षण प्रणाली
FUTURE READY SCHOOL
माऊंट लिटेरा झी स्कूल
अरणगांव, दौंड रोड, अहिल्यानगर
8263063744 / 7038730387

पुरुषांसाठी ब्रँडेड प्रिमियम कॉलिटी
टी-शर्ट / शर्टस् / फॉरमल पँट
जिन्स / ट्राऊजर्स / नाईट पँट
भरपूर व्हरायटीज् काहीही घ्या एक ₹ 500 ला / दोन ₹ 800 ला व ₹ 1000 मध्ये तीन
मर्यादित स्टॉक
अहिल्यानगर शहरातील भव्य मॉल
पुरुषांसाठी सर्व काही
शुभ मॉल
मयुरी लेडिज मॉलच्या वर
मल्हार चौक, आयकॉन पब्लिक स्कुल जवळ, आगरकर मळा, अहिल्यानगर. ९०२८२०११८८


# जंगली रमी सारख्या ऑनलाईन जुगारविरोधात 'पीपल्स हेल्पलाईन'कडून 'जनआंदोलना'ची हाक

## जाहिरातीत अभिनेते आणि क्रिकेटपटूंना वापरून समाजाची फसवणूक; जुगाराची जाहिरात करणाऱ्या सेलिब्रिटिंचा केला जाणार निषेध

नगर - डिजिटल युगात बेरोजगार, गरीब व मध्यमवर्गीय जनतेला सोन्याचं स्वप्न दाखवून लुबाडणाऱ्या जंगली रमी सारख्या ऑनलाइन जुगार ॲप्सविरोधात पीपल्स हेल्पलाईनच्या वतीने क्रांतिकारक जनआंदोलनाची हाक देण्यात आली आहे. जुगाराच्या विळख्यात अडकणाऱ्या भावी पिढीला वाचविण्यासाठी पुढाकार घेण्यात आला असल्याचे ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. कारभारी गवळी यांनी सांगितले.

या ॲप्सच्या जाहिरातीत लोकप्रिय अभिनेते आणि क्रिकेटपटूंना वापरून समाजाला फसवले जात आहे. युवक, विद्यार्थी आणि सामान्य कुटुंबातील सदस्य या सेलिब्रिटीना आदर्श मानून त्यांच्या जाहिरातींवर विश्वास ठेवतात. परिणामी, अनेक कुटुंबे आर्थिक अंधारात लोटली जात असल्याचे संघटनेच्या वतीने स्पष्ट करण्यात आले.




जंगली रमी ही एक ॲप नव्हे ती आर्थिक गुलामगिरीची व्याधी आहे. आजचा लढा केवळ जुगारविरोधी नाही, तो आपल्या देशाच्या आर्थिक, नैतिक आणि सांस्कृतिक सुरक्षिततेसाठीचा लढा असून, सजग नागरिक म्हणून या आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन संघटनेच्या वतीने करण्यात आले आहे.

लोकभद्र्यक तत्वज्ञान म्हणजे लोकभक्ती, ज्ञानभक्ती आणि कर्मभक्ती या त्रिसूत्रीवर सामाजिक आदर्शांची मांडणी केली जाते. कलाकार व खेळाडू हे समाजाचे आदर्श असल्याने भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ५१(अ) अंतर्गत त्यांच्यावर सार्वजनिक जबाबदारी आहे. परंतु, हेच लोक जेव्हा जुगाराच्या ॲप्सची जाहिरात करतात, तेव्हा ते त्या जबाबदारीचा भंग करत असल्याचे ॲड.कारभारी गवळी यांनी सांगितली.

जेव्हा एखाद्या व्यक्तीला वाटतं की, कोणीतरी पाहतंय, तेव्हा त्याचं वर्तन बदलतं. हे सांगत त्यांनी लोकशक्तीच्या सजगतेवर विश्वास ठेवायला सांगितले. सामाजिक प्रतिष्ठा गमावणे हा कोणत्याही शिक्षा पेक्षा अधिक परिणामकारक दंड ठरतो, असेही त्यांनी नमूद केले.

या अपप्रवृत्तींविरोधात अहिंसात्मकपण परिणामकारक आंदोलन केले जाणार आहे. ज्यांनी जंगली रमीची जाहिरात केली त्यांच्या फोटोचे फ्लेक्स सार्वजनिक रस्त्यांवर टाकून, नागरिक त्यांना तुडवित चालणार आहेत, असा ठोस संदेश त्यांनी दिला. हे लोक समाजद्रोही वर्तन करत असून, त्यांची लोकप्रियता व प्रतिष्ठा जनतेने आता नाकारली आहे, असे स्पष्ट जाहीर केले जाणार आहे. हे आंदोलन प्रत्येक जिल्हा, तालुका, गाव, वस्ती आणि सोशल मीडियावर जनजागृती करून जंगली रमी आणि तत्सम जुगार ॲप्समुळे झालेल्या आर्थिक विनाशाच्या कहाण्या लोकांपर्यंत पोहचवण्यात येणार आहे.


CONNPLEX CINEMAS
13 & 14 MAY 2025
BLOCKBUSTER TUESDAY & WEDNESDAY
ANY MOVIE ANY SHOW ₹99 | ₹149
GET READY TO EXPERIENCE ULTIMATE BIG SCREEN CELEBRATION WITH MOVIETIME CINEMAS

दिनांक - 08 मे ते 15 मे 2025
टिप : मुव्ही-शो च्या वेळा बदलु शकतात
MAJHI PRARTHANA 07:15 PM
BHOOL CHUK MAAF 08:30 AM | 10:00 AM 12:30 PM | 03:00 PM 05:30 PM | 08:00 PM 10:30 PM
GULKAND 04:30 PM
ATA THAMBAYCHA NAAY 01:45 PM
RAID 2 09:15 AM 12:00 PM | 02:40 PM 05:20 PM | 08:00 PM 10:00 PM | 10:40 PM
PSI ARJUN 1100P M
- For Screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher*
- Offer Valid On Window Booking & Phone Booking
Ahilyanagar First & Most Luxurious Cinematic Paradise !
CONNPLEX SMART THEATRE
3rd Floor, Kohinoor Mall, Premdan Chowk, Savedi, A.Nagar
Mo. 6353564618 / 7790094001



लोकसेवेचे व्रत आपण जीवनभर जपले...स्वतः चंदनापरी झिजुन आम्हाला सुगंध देत राहीले...सर्वांवर असलेली प्रेमभावना यामुळेच आपण वंदणीय झाले...
आधारवड





अहिल्यानगरचे ज्येष्ठ नेते व माजी आमदार आदरणीय
स्व.अरुणकाका बलभीमराव जगताप यांना
भावपूर्ण श्रद्धांजली
: शोकाकूल :
महावीर इंटरनॅशनल
वीर वीरा मिरॅकल युवक ग्रुप
अहिल्यानगर सेंटर

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# जिल्हा रुग्णालय व आयुष्य रुग्णालयात कर्मचारी वर्गाचा बेशिस्तपणा व अरेरावी

## कर्मचाऱ्यांवर कारवाईची मागणी; गांधीगिरीने जिल्हा शल्य चिकित्सकांचे वेधले लक्ष;धडक जनरल कामगार संघटना व छावा संघटनेचा रुग्णालयात धडक आंदोलन

नगर – जिल्हा रुग्णालय व आयुष्य रुग्णालयात कर्मचारी वर्गाचा बेशिस्तपणा व अरेरावीच्या विरोधात धडक जनरल कामगार संघटना व छावा संघटनेच्या वतीने आंदोलन करण्यात आले. बेशिस्त कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याच्या मागणीसाठी जिल्हा शल्य चिकित्सक यांच्या खुर्चीला पुष्पहार अर्पण करून गांधीगिरी करण्यात आली.

या आंदोलनात छावा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष रावसाहेब काळे पाटील, जिल्हाध्यक्ष विनोद साळवे, धडक जनरल कामगार संघटनेचे जिल्हाध्यक्ष श्रीधर शेलार, शिवसेना भटक्या विमुक्त आघाडीचे जिल्हाध्यक्ष सुभाष अल्हाट, छावा संघटनेचे जिल्हा सचिव हजरत शेख, तसेच अ.भा. छावाचे युवा प्रदेश सचिव दत्ता वामन, योगेश पवार, सुभाष काकडे, परविनताई शेख, अ.भा. छावा संघटनेच्या महिला जिल्हाध्यक्षा सुरेखाताई सांगळे, रजनीताई ताठे, मालनताई जाधव, वाणी ताई आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते.

जिल्हा रुग्णालय व आयुष्य रुग्णालयातील अनेक कर्मचारी बेशिस्त व अरेरावीची भाषा वापरत आहेत. रुग्णालयात येणारे रुग्ण हे ग्रामीण भागातील गरीब व सामान्य नागरिक आहेत, ज्यांना उपचारासाठी तासंतास प्रतीक्षा करावी लागते. कर्मचाऱ्यांकडे गणवेश व ओळखपत्र नसणे, वेळेवर अनुपस्थित राहणे आणि रुग्णांसोबत उद्धटपणा करणे या गंभीर तक्रारी आंदोलकांनी केल्या.

या संदर्भात जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. नागोराव चव्हाण यांनी समक्ष आंदोलकांची भेट घेऊन चर्चा केली. आंदोलकांनी आयुष्य रुग्णालयातील कर्मचारी वर्गाच्या बेशिस्तपणाचा मुद्दा लावून धरला होता. आयुष्य रुग्णालयातील कर्मचाऱ्यांच्या बेशिस्त वागणुकीसंदर्भात त्यांनी आयुर्वेद वैद्यकीय अधिकाऱ्याला कारणे दाखवा नोटीस बजावली. तसेच जिल्हा रुग्णालयातील इतर तक्रारींची चर्चा करून पुढील कारवाईचे आश्वासन दिल्यामुळे आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले.


जिल्हा व आयुष रुग्णालयात येणारे सर्व रुग्ण हे आपल्या समाजातील कष्टकरी, गरीब, वंचित वर्गातील असतात. त्यांच्या सेवेसाठी शासनाने सुविधा उभारल्या आहेत, मात्र काही कर्मचारी व अधिकारी आपले कर्तव्य पार न पाडता, त्यांच्यावर रुबाब दाखवून अरेरावी करतात. हे अजिबात खपवून घेतले जाणार नाही. सरकारी यंत्रणा ही लोकसेवेचे साधन आहे, कर्मचाऱ्यांनी आपले वर्तन सुधारले नाही, तर यापुढे अधिक तीव्र आंदोलन केले जाईल, असा इशारा छावा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष रावसाहेब काळे पाटील यांनी दिला आहे.



जिल्हा रुग्णालय व आयुष्य रुग्णालयात कर्मचारी वर्गाचा बेशिस्तपणा व अरेरावीच्या विरोधात धडक जनरल कामगार संघटना व छावा संघटनेच्या वतीने आंदोलन करण्यात आले.

## प्रेरणादायी अक्षरधन...

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षरधन
"मुसाफिर"–९८२२०२०६९१



### आनंदाची परिपूर्ती... नवनिर्मिती...

कोणतीही नवनिर्मिती ही आधीच्या निर्मितीपेक्षा सरस असते असं गृहित धरता येते. पण ते केवळ भौतिक निर्मितीच्या संदर्भात.

विचारांच्या, संकल्पनांच्या, संस्कारांच्या संदर्भात हे सरसकट म्हणता येत नाही. कारण या सर्व गोष्टी अमूर्त आहेत. मानवाच्या मानसिक स्तरावरच्या आहेत आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे व्यक्तिसापेक्ष, व्यक्ती–व्यक्तीनुसार असतात.

आजच्या पिढीला जे योग्य वाटत आहे ते मागच्या पिढीला कदाचित रुचणार नाही आणि हीच परिस्थिती उद्याच्या पिढीची असेल. एकच विचार पिढ्यान्‌पिढ्या चालत आला म्हणजे ते निर्विवादपणे योग्य आहे किंवा त्याला विरोध होतोय म्हणजे तो अयोग्यच आहे असे नाही.

आज आम्ही ६०/७० च्या दशकात जन्मलेल्या पिढीने तर नैतिकता, आदरयुक्त भितीपासून आजच्या हाय हॅलो करणाऱ्या टेक्नीसेव्ही पिढीला पाहताना नात्यांसह भौतिक, सामाजिक, आर्थिक व ग्लोबल बदलांचा अद्‌भूत बदल पाहिलाय.

आजची पिढी प्रॅक्टीकल आहे. यात त्यांचीही चूक नाही. वेगवान काळात नात्यांपेक्षा, परंपरा–संस्कृतीपेक्षा फक्त प्रगती करणे (त्यातही आर्थिक) त्यांना महत्त्वाचे वाटते.

परंपरा, पौराणिकता, विचार, वाङ्मय, शस्त्रे ही नीट पारखून, त्याचे विश्लेषण, पृथकरण करून काळ, वेळ, परिस्थितीनुसार आवश्यक ते बदल करून जीवन जगायला हवं – साजरे करायला हवं. आमच्या वेळेस असं नव्हतं हे वाक्यच विसरायचं व आलेला दिवस व क्षण जास्तीत जास्त आनंदाने व समाधानाने घालवायचा – बघा पटतंय ना.

## दस्तनोंदणीबाबत सूचना

नगर – खरेदी विक्री होणाऱ्या शेतजमीनीचे क्षेत्रफळ प्रमाणभूत क्षेत्रापेक्षा कमी नसेल तर त्या दस्ताला मोजणी नकाशा जोडण्याची आवश्यकता नाही. दस्तामध्ये मिळकतीची ओळख पटण्याइतपत पुरेसे वर्णन नमूद करावे लागते. याबाबतीत कोणताही बदल करण्यात आलेला नाही. आतापर्यंत दस्तऐवज नोंदणीसाठी जी कागदपत्रे आवश्यक होती ती कागदपत्रे सध्यादेखील आवश्यक आहेत. त्या कागदपत्रांमध्ये कोणतीही वाढ करण्यात आली नसल्याचे सहजिल्हा निबंधक वर्ग–१, अहिल्यानगर यांनी कळविले आहे.

## २७ मे रोजी 'निधी आपके निकट' कार्यक्रम

नगर – निवृत्तीवेतनधारक आणि कंपनी मालकांसाठी मराठा चेंबर्स ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज अँड ग्रिकल्चर, एमआयडीसी, अहिल्यानगर येथे २७ मे रोजी सकाळी १० वाजता 'निधी आपके निकट' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. निवृत्तीवेतनधारक आणि कंपनी मालकांच्या भविष्यनिर्वाह निधीच्या अडचणी असतील तर आवश्यक त्या कागदपत्रांसह या कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन कर्मचारी भविष्य निधी संघटनेच्या सहायक भविष्य निधी आयुक्तांनी केले आहे.

# केडगाव उपनगरात भीषण पाणीटंचाईने नागरिक त्रस्त; आंदोलनाचा दिला इशारा

नगर – केडगाव उपनगरात मागील २ ते ३ महिन्यांपासून तीव्र स्वरूपाची पाणीटंचाई निर्माण झाली असून नागरिकांचे हाल सुरू आहेत. उन्हाळ्याचे तीव्र चटके बसत असताना देखील पाणीपुरवठा सुरळीत करण्यास महापालिका अपयशी ठरत आहे. या संदर्भात माजी सभापती मनोज कोतकर यांनी महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांना निवेदन देत तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे.

कोतकर यांनी सांगितले की, नागरिक वेळेवर पाणीपट्टी भरत असूनही त्यांना पाणी मिळत नाही, उलट पाणीपट्टीत वाढ केली जात आहे. काही भागात ८–८ दिवसांनी कमी दाबाने पाणी येते, तर काही ठिकाणी टँकरद्वारे होणारा पुरवठा आता २० दिवसांनी होत आहे. केडगावमधील महिला वर्गामध्ये महापालिकेविरोधात तीव्र संतापाची लाट उसळली आहे. त्यांना घरगुती वापरासाठी पाणी मिळत नसल्याने विकत पाणी खरेदी करावे लागत आहे. दिवसाआड होणारा टँकर पुरवठा आता महिन्यातून एकदाच होतो, अशी नागरिकांची तक्रार आहे. शटडाऊन, विद्युत पुरवठा खंडित होणे, तसेच पंप दुरुस्तीच्या कारणांखाली महापालिकेने जबाबदारी झटकली आहे. मात्र कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात आलेली नाही. येणाऱ्या ८ दिवसांत पाणीपुरवठा सुरळीत झाला नाही, तर मनपात तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडले जाईल, असा इशारा मनोज कोतकर यांनी दिला आहे. यावेळी भाजप माजी शहर अध्यक्ष महेंद्र गंधे, शुभम टाक, वैभव तापकिरे, संकेत काळे उपस्थित होते.

आयुक्त यशवंत डांगे यांनी केडगाव चा पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी अधिकारी कर्मचाऱ्यांची यांची बैठक बोलावून सूचना दिल्या जातील व केडगावचा पाणीपुरवठा सुरळीत केला जाईल असे त्यांनी यावेळी सांगितले.



केडगावचा पाणीपुरवठा सुरळित करा, या मागणीचे निवेदन मनपा आयुक्त यशवंत डांगे यांना देताना माजी सभापती मनोज कोतकर आदी. (छाया – लहू दळवी)

## केडगाव येथे पाण्याच्या हौदात पडून वृद्धाचा मृत्यू

नगर – पाण्याच्या हौदात पाय घसरून पडल्याने वृद्धाचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची घटना केडगाव उपनगरात एकतानगर येथे १३ मे रोजी सायंकाळी ७.५५ च्या सुमारास घडली. छबुराव महादेव कांबळे (वय ७८, रा. एकतानगर, केडगाव) असे मयताचे नाव आहे.



छबुराव कांबळे (मयत)

छबुराव कांबळे हे घराशेजारील हौदात पाय घसरून पडले. ही बाब निदर्शनास आल्यावर त्यांच्या कुटुंबीयांनी त्यांना उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केले. मात्र तेथील डॉक्टरांनी त्यांना उपचारापूर्वीच मयत घोषित केले. या प्रकरणी कोतवाली पोलिस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. मयत कांबळे यांच्या पश्चात १ मुलगा, १ मुलगी, सून, नातू असा परिवार आहे. महापालिकेतील कर्मचारी संतोष कांबळे यांचे ते वडील होत.

# ऑपरेशन सिंदूरमध्ये हुतात्मा झालेल्यांना जवानांना आदरांजली

## चौपाटी कारंजा मित्र मंडळाचा उपक्रम

नगर – पहेलगाम घटनेनंतर भारताने पाकिस्तानवर केलेल्या ऑपरेशन सिंदूरमध्ये काही भारतीय जवान व अधिकारी हुतात्मा झाले आहेत. या हुतात्म्यांप्रति आदर व्यक्त करण्यासाठी अहिल्यानगरच्या चौपाटी कारंजा मित्रमंडळाच्यावतीने दिल्लीगेट येथील कुबेर गणपती मंदिरात माजी सैनिकांच्या हस्ते महाआरती करून त्यांना श्रद्धांजली वाहण्याचा भावनिक उपक्रम राबवला. सेवानिवृत्त कमांडर राहुल जाधव, पुर्व सैनिक सेवा परिषदेचे अध्यक्ष भाऊसाहेब वाबळे व संघटक सुभाष सुर्यवंशी, सेवानिवृत्त वायुसेना अधिकारी डॉ.दामोदर कळमकर व ज्ञानदेव भांगे आदींच्या हस्ते कुबेर गणेशाची आरती करण्यात आली. यावेळी भारताचा तिरंगा ध्वज हाती घेऊन भारतमातेचा जयजयकार उपस्थितांनी केला.

यावेळी राहुल जाधव म्हणाले, भारतीय सेनेमुळे सर्व भारतवासीय सुरक्षित आहेत. पण केवळ २६ जानेवारी, १५ ऑगस्ट व युद्धाच्या प्रसंगीच नागरिकांमध्ये राष्ट्राप्रती सैनिकांप्रती आदराच्या भावना निर्माण होतात हे चुकीचे आहे. नागरिकांनी कायम आपल्या भारतमातेप्रती आदर बाळगून सन्मान करावा असे आवाहन केले.

भाऊसाहेब वाबळे म्हणाले, भारतीय सेनेने पाकिस्तानला योग्य धडा शिकवून पहेलगाम घटनेचा बदला घेतला आहे. आपली सेना खूप शूर आहे. अधिकारी योग्यवेळी योग्य निर्णय घेतात. नागरिकांना वाटते एकदम मोठा हल्ला करावा, पण तसे नसते, असे सांगून देशाच्या व धर्माच्या रक्षणासाठी सर्वांनी योगदान द्यावे, असे आवाहन केले.

प्रास्ताविकात चौपाटी कारंजा मित्रमंडळाचे अध्यक्ष महेश कुलकर्णी म्हणाले, चौपाटी कारंजा मित्रमंडळाच्यावतीने दर मंगळवारी कुबेर गणपतीची महाआरती करण्याचा उपक्रम राबवत आहे. प्रत्यक्ष सीमेवर देशाचे रक्षण करणाऱ्या माजी सैनिकांच्या हस्ते या मंगळवारची महाआरती करून ऑपरेशन सिंदूरमध्ये हुतात्मा झालेल्या सैनिकांना आदरांजली अर्पण करण्यात आली आहे.


यावेळी विश्व हिंदू परिषदेचे गजेंद्र सोनवणे, मुकुल गंधे, उल्हास ढोरे, चौपाटी कारंजा मित्रमंडळाचे अमोल भंडारे, ॲड.पराग देशमुख, नरेंद्र सोनवणे, सुरेंद्र सोनवणे, तेजस वैद्य, प्रदीप बोज्ञा, सुचित भळगट, महेंद्र ताकपिरे, मनिष भंडारे, सागर रोहोकले, राहुल वरखेडकर, प्रकाश घुबे, श्रीपाद वखारे, महेश देशपांडे, कालिंदी केसकर आणि मुक्ताई भजनी मंडळाच्या सर्व महिला उपस्थित होत्या.



चौपाटी कारंजा मित्र मंडळाच्यावतीने पहेलगाम घटनेत हुतात्मा झालेल्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी माजी सैनिकांच्या हस्ते कुबेर गणपतीची महाआरती करून भारतमातेचा जयजयकार करण्यात आला.

## अब्दुलसत्तार शेख यांचे वृद्धापकाळाने निधन

नगर – नगर येथील रहिवासी अब्दुलसत्तार शेख (वय ८२) यांचे १४ मे रोजी वृद्धपकाळाने निधन झाले. त्यांच्यावर काटवन खंडोबा येथील कब्रस्थानमध्ये दफनविधी करण्यात आला. त्यांच्या पश्चात एक बहीण, पाच मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे.



अब्दुल सत्तार शेख हे सामाजिक कार्यामध्ये अग्रेसर असायचे. येथील आशा टॉकीज चौक या ठिकाणी त्यांनी सरबत व्यवसाय सुरू केला होता. विविध क्षेत्रामध्ये त्यांनी आपल्या कार्याचा ठसा उठवला होता. शाकीर शेख यांचे ते वडील होत.

## द्वारकाबाई ठोंबरे यांचे अल्पशा आजाराने निधन

नगर – चिचोंडी पाटील येथील रहिवासी द्वारकाबाई जगन्नाथ ठोंबरे (वय ७०) यांचे १४ मे रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर चिचोंडी पाटील अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे पती, १ मुलगा, सुना, २ मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. जगन्नाथ सोनोजी ठोंबरे यांच्या त्या पत्नी तर संजय ठोंबरे यांच्या मातोश्री होत.

## अमित गटागट यांचे अल्पशा आजाराने निधन

पाथर्डी – येथील रहिवासी अमित नंदकुमार गटागट (वय ४०) यांचे १४ मे रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर पाथर्डी येथील अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे आई–वडील, १ भाऊ, भावजय, २ चुलते, काकू असा परिवार आहे. सनी गटागट यांचे ते मोठे बंधू होत.

## तलावात बुडून युवकाचा मृत्यू

नगर – मित्रांच्या समवेत पोहण्यासाठी गेलेल्या तरुणाचा पोहताना दम तुटल्याने तलावाच्या पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची घटना १३ मे रोजी सकाळी ८.४५ च्या सुमारास निंबळक बायपास जवळील तलावात घडली. प्रतीक राजू रणदिवे (२५, रा.बोल्हेगाव फाटा, अ.नगर) असे मृत तरुणाचे नाव आहे.

प्रतीक रणदिवे हा १३ मे रोजी सकाळी काही मित्रांच्या समवेत निंबळक बायपास जवळील तलावात पोहण्यासाठी गेला होता. तलावात पोहत किनाऱ्यापासून दूर अंतरावर गेल्यावर त्याचा पोहताना दम तुटला व तो पाण्यात बुडाला. त्यावेळी त्याच्या मित्रांनी आरडा ओरडा केला. तो ऐकून परिसरातील नागरिक जमा झाले. काहींनी त्याला शोधण्यासाठी पाण्यात उड्या मारल्या. काही वेळाने त्याला बेशुद्धावस्थेत पाण्याच्या बाहेर काढून उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात नेले. मात्र तेथील डॉक्टरांनी त्यास तपासून तो उपचारापूर्वीच मयत झाला असल्याचे घोषित केले. याप्रकरणी जिल्हा शासकीय रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. खेडकर यांनी दिलेल्या अहवालावरुन एमआयडीसी पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

## सीडीएस भरतीपूर्व प्रशिक्षणाच्या निवडीसाठी २ जून रोजी मुलाखतीस उपस्थित रहावे

नगर – भारतीय सशस्त्र दलामध्ये अधिकारी पदावर भरती होण्यासाठी छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र नाशिक येथे १६ जून ते २९ ऑगस्ट या कालावधीत सीडीएस भरतीपूर्व प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील इच्छुकांनी या प्रशिक्षणाच्या मुलाखतीसाठी २ जून रोजी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, अहिल्यानगर येथे उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, अहिल्यानगर यांनी केले आहे.

सीडीएस प्रशिक्षणासाठी उमेदवार कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा. उमेदवार लोकसंघ आयोग (युपीएससी), नवीदिल्ली यांच्यामार्फत घेण्यात येणाऱ्या सीडीएस परीक्षेसाठी ऑनलाईन अर्ज सादर केलेला असावा. मुलाखतीसाठी येतेवेळी सैनिक कल्याण विभागाच्या संकेतस्थळावर सीडीएस ६५ कोर्ससाठी किंवा संबंधित जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाने दिलेले प्रवेशपत्र व त्यासोबतच्या परिशिष्टाची छायांकित प्रत भरुन सोबत आणणे आवश्यक राहील.

माहितीसाठी प्रभारी अधिकारी, छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक यांच्या कार्यालयाशी अथवा ०२५३–२४५१०३२, ९१५६०७३३०६ या दूरध्वनी क्रमांकावर किंवा या training.petenashik@gmail.com ई–मेल पत्त्यावर संपर्क साधावा, असेही कळविण्यात आले आहे.



माळीवाडा येथील शंकर सावली मठात चोरी करणारा आरोपी मुद्देमालासह पकडलनंतर त्याच्यासमवेत कोतवाली पोलिसांचे पथक.



भारत–पाकिस्तान तणावाच्या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीच्या वतीने पाकिस्तानचा निषेध करुन सैनिकांचे मनोबल वाढवण्यासाठी अहिल्यानगरमध्ये प्रार्थना, श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी संतोष गायकवाड, रवींद्र कांबळे, राम गायकवाड, दीपक पाटोळे, मिलिंद आंग्रे, विजीतकुमार ठोंबे, अविनाश राक्षे, प्रमोद भिंगारदिवे, राजेंद्र पाडळे, योगेश साठे, हनीफ शेख, रविकिरण जाधव, प्रसाद भीमसने, शरीफ भाई, गणेश राऊत, अशोक देवडे, शेख अरफान आदी. (छाया – प्रसाद शिंदे)

## वंचित बहुजन आघाडीतर्फे पाकिस्तानचा निषेध

### सैनिकांचे मनोबल वाढवण्यासाठी अहिल्यानगरमध्ये प्रार्थना, श्रद्धांजली अर्पण

नगर – सध्या भारत आणि पाकिस्तानमध्ये तणावाचे वातावरण निर्माण झाले असून पहलगाम येथे पर्यटकांवर झालेल्या भ्याड हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानातील दहशतवादी तळांवर एअर स्ट्राईक केल्याने पाकिस्तानची मोठी झोप उडाली आहे. याला प्रत्युत्तर म्हणून पाकिस्तानकडून भारताच्या सीमांवर बेछूट गोळीबार आणि ड्रोन हल्ले सुरू करण्यात आले. मात्र भारतानेही या हल्ल्यांना सडेतोड प्रत्युत्तर देत सर्व हल्ले परतावून लावले.

या पार्श्वभूमीवर भारतीय सैन्याचे मनोबल वाढवण्यासाठी आणि पहलगाम हल्ल्याचा तीव्र निषेध करण्यासाठी वंचित बहुजन आघाडी आणि भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने अहिल्यानगर शहरात विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी शहरातील शहीद भगतसिंग यांच्या स्मारकाला पुष्पहार अर्पण करून सैनिकांच्या सुरक्षिततेसाठी आणि विजयासाठी सामूहिक प्रार्थना करण्यात आली.

या वेळी वंचित बहुजन आघाडीचे नेते बाळासाहेब आंबेडकर यांच्या जन्मदिनानिमित्त त्यांच्या दीर्घायुष्यासाठी त्रिसरण पंचशील प्रार्थना देखील करण्यात आली. या कार्यक्रमाला संतोष गायकवाड, रवींद्र कांबळे, राम गायकवाड, दीपक पाटोळे, मिलिंद आंग्रे, विजीतकुमार ठोंबे, अविनाश राक्षे, प्रमोद भिंगारदिवे, राजेंद्र पाडळे, योगेश साठे, हनीफ शेख, रविकिरण जाधव, प्रसाद भीमसने, शरीफ भाई, गणेश राऊत, अशोक देवडे, शेख अरफान यांच्यासह वंचित बहुजन आघाडी व भारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# गृहिणी

## आरोग्य

### पाचन सुधारण्यासाठी

रोज सकाळी रिकाम्या पोटी तूप पाणी प्यायल्याने अनेक फायदे मिळतात. यासाठी एका ग्लासमध्ये कोमट पाणी घ्या. त्यामध्ये चमचाभर चांगले साजुक तूप घाला. ते ढवळा आणि मग ते पाणी पिऊन टाका. लहान भांडे प्यायले तरी चालेल. चव अगदीच वाईट लागत नाही. त्यामुळे हे पाणी पिणे नक्कीच त्रासाचे नाही. वजन कमी करण्यासाठी अनेक उपाय करत असाल तर मग हा एक उपाय कराच. नक्की फरक जाणवेल. रोज सकाळी गरम पाण्यातून तूप घ्यायचे. वजन कमी करण्यासाठी त्याचा फायदा होतो. मात्र त्यासोबत चांगला आहार घ्यायला हवा. व्यायामही करायला हवा. इतरही गोष्टी चांगल्या हव्यात. न चुकता रोज असे पाणी प्यायल्यावर हळूहळू फरक जाणवायला लागेल.

## पाककला

### व्हेजिटेबल रवा उपमा

**साहित्य :** २ कप उपमा रवा, १ कांदा, १ शिमला मिर्च मिरची, १ टोमॅटो, १ इंच आले चिरून, १ चमचा तेल १ /२ टीस्पून जीरे पावडर, १ टीस्पून मोहरी, २ मिरची, ५-६ कढीपत्ता, हिंग, १/३ कप वाटाणे, मीठ, १ शिमला मिर्च, कोमट पाणी कोथिंबीर

**कृती :** रवा चाळून घ्यावा. कांदा, शिमला मिर्च मिरची, टोमॅटो, आले चिरून घ्यावे. रवा, ४-५ मिनिट भाजून घ्यावा. आता एका कढईत तेल टाकून ते गरम झाल्यावर, त्यात जीरे मोहरी टाकावे. कांदा, मिरची, कढीपत्ता, हिंग टाकावा. कांदा किंचित सोनेरी झाल्यावर, त्यामध्ये वाटाणे, शिमला मिर्च, आणि आले टाकावे. ते थोडे सॉफ्ट झाल्यावर त्यात भाजलेला रवा आणि चवीनुसार मीठ टाकावे. चांगले परतून घ्यावे. त्यानंतर त्यात गरम केलेले पाणी टाकून मिक्स करून घ्यावे. झाकण ठेवून ४-५ मिनिट वाफ काढून घ्यावी.

## वास्तू

### मुख्य दरवाजाचा रंग

* घराच्या मुख्य दरवाजासाठी पिवळा, तपकिरी किंवा पांढरा रंग शुभ मानला जातो. हे रंग सकारात्मक ऊर्जा आकर्षित करतात. गडद रंग टाळणे योग्य आहे.

* घराच्या मुख्य दरवाजाचा रंग घराच्या दिशेनुसार आणि तिच्या सकारात्मकतेनुसार निवडणे आवश्यक आहे. घराच्या मुख्य दरवाजासाठी पिवळा, तपकिरी किंवा पांढरा रंग निवडल्यास घरात सकारात्मक ऊर्जा आकर्षित होते आणि वातावरण प्रसन्न राहते. काळ्या रंगासारखे गडद रंग नकारात्मक ऊर्जा आकर्षित करतात, त्यामुळे घराच्या मुख्य दरवाजासाठी गडद रंग निवडणे टाळावे.

## सल्ला

मोबाईल स्पिकरचा आवाज येत नसेल तर स्पिकर साफ करण्यापुर्वी एक स्वच्छ आणि कोरडा ब्रिसल असलेला टुथब्रश किंवा छोटा पेंट ब्रश वापरा. यामुळे स्पीकर ग्रीलवर हलक्या हाताने ब्रशने साफ करा. ब्रशमुळे ग्रिलवरील धुळ सहजरित्या बाहेर निघू शकेल. ब्रश मात्र एकदम कोरडा असू द्यात.

## सौंदर्य

कोरफड जेल थेट त्वचेवर लावण्याऐवजी, ते इतर सौंदर्य उत्पादनांमध्ये मिसळून वापरणे अधिक सुरक्षित असू शकते त्याचबरोबर कोरफडीचा वापर करण्यापूर्वी, त्वचेवर थोडेसे जेल लावून परीक्षण करणे आवश्यक आहे.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

गुरुवार, दि. १५ मे २०२५

**---, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, वैशाख कृष्णपक्ष, ज्येष्ठा १४।०८, सूर्योदय ०६ वा. २९ मि. सूर्यास्त ०५ वा. ४० मि.**

### राशिभविष्य

**मेष** : शत्रुपक्ष हावी राहील. आर्थिक क्षेत्रात अनुसंधान संबंधी योग. मन रमणार नाही. मित्रांचा सहयोग मिळेल. मनोबल वाढेल.

**वृषभ** : पारिवारिक वाद वाढतील. खर्च होईल. आपल्या आरोग्याची काळजी घ्याल. मनोबल वाढेल. व्यापार क्षेत्रात लाभ. सुखद वातावरण राहील.

**मिथुन** : साथ लाभेल. व्यक्तिगत कामात उन्नति होईल. स्वप्ने पूर्ण होतील. अविवाहितांसाठी लग्नाचे प्रस्ताव. लांबलेल्या प्रकरणात यश.

**कर्क** : कायदेशीर कामात आत्मविश्वास कमी राहील. कौटुंबिक विषयांमध्ये आपणास समर्थन मिळेल. अध्ययनात छान यश. परिश्रमाने कामाचे शुभ परिणाम येतील.

**सिंह** : अडकलेला पैसा मिळेल. गुंतवणूकीतून लाभ होण्याची शक्यता. आर्थिक विषयांसाठी स्थिती अनुकूल आहे. तणाव अडचणी राहतील. खर्च वाढतील. तुमच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव पडेल.

**कन्या** : आपल्या विवेक बुद्धिच्या उलट काम झाल्याने हानि होऊ शकते. आपल्या इच्छा आकांक्षा पूर्ण होतील. खर्चाचे प्रमाण कमी होईल.

**तूळ** : आपल्या प्रयत्नाने उन्नति कराल. धनलाभ होईल. वरिष्ठांची मर्जी राहील. कार्यक्षेत्राचा विकास आणि विस्तार होईल. सामाजिक प्रतिष्ठा लाभेल.

**वृश्चिक** : नवीन कामांना चालना मिळेल. अधिकार क्षेत्रात वाढ होईल. आरोग्य मध्यम राहील. कला, संगीत, नाट्य क्षेत्रात सुसंधी मिळेल.

**धनु** : आपल्या कामांची समाजात चर्चा होईल. लाभाच्या संधी. नवीन ओळखी संभवतात. प्रतिष्ठा लाभेल. घरातील व्यक्तिशी वाद होऊ शकतो. खर्च वाढतील.


**मकर** : आपल्या बुद्धि आणि तर्काने कार्यात यशाची शक्यता. कामाला वाव मिळेल. आपले निर्णय, विचार इतरांवर थोपवाल.

**कुंभ** : संपत्तीच्या कामात यश मिळण्याचे योग. मनात नवीन कल्पना सुचतील. उधारी, उसनवारी वसूल होईल. व्यवसायात वाढ होईल.

**मीन** : वातावरण उत्साहवर्धक राहील. सामाजिक मान-सन्मान वाढेल. व्यापारिक लाभ आणि सुख-समृद्धि वाढेल. व्यापारिक भागीदारीसाठी उत्तम वेळ. आर्थिक लाभाचे प्रमाण चांगले राहील.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**


## शब्दगंध क्र. ७१७७ सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) अनुमान; तर्क; कयास ४) आदरयुक्त भीती किंवा दरारा ८) अटीची भाषा १०) विष; जहर; सापाचे विष ११) रक्तवाहिनी; धमनी; शीर १२) मनास वाटणारी स्वस्थता; आराम; आनंद १४) दणदण असा मोठा व एकसारखा होणारा आवाज १६) त्वरित; थेट; कुठेच न थांबता १८) कारस्थानी लोक १९) तेलकट किंवा तुपकट २१) टपाल; पोस्ट; मेल २३) कविता करणारा; काव्य रचणारा २४) भारताचे एक माजी पंतप्रधान - ++++++ वाजपेयी

**उभे शब्द :-** १) हनुमान; मारुती २) दरवाजा; द्वार; कवाड ३) काळजीपूर्वक रक्षण; संगोपन ५) इराकची राजधानी ६) हर; किंमत; भाव; प्रत्येक ७) लहान मूल ९) सैन्य वगैरेंना पुरविला जाणारा दाणागोटा, शस्त्रे वगैरे; कुमक १३) गोंधळ; मोठा आवाज १५) प्रफुल्लित; ताजातवाना १७) पक्षी किंवा लहान मुलांचा गोंधळ २०) संशय; संदेह; शंका २२) एक समसंख्या; रावणाच्या तोंडांची संख्या

शब्दगंध क्र. ७१७६ चे उत्तर



# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक :
ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : इतरांना सुख देणे म्हणजेच आपल्या जीवनाला सोपे व सुखी करणे होय.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### पक्ष्यांचा थवा उडताना 'व्ही'शेपमध्ये का असतो?

आकाशाकडे पाहिल्यावर आपल्याला नेहमी हवेमध्ये उडणारे पक्षी दिसत असतात. काही पक्षी स्वतःसाठी, तर काही त्यांच्या पिल्लांसाठी खाद्य शोधत असतात. तर काही जोडीदाराचा शोध घेत असतात. संध्याकाळी अनेकदा आकाशामध्ये पक्षांचा थवा उडताना पाहायला मिळतो. जर नीट निरीक्षण केलं तर पक्षांचे थवे हे इंग्रजी भाषेतील 'V' अक्षरासारखे दिसतात हे तुमच्या लक्षात येईल. अशा वेळी पक्षी हवेत एकत्र उडत असताना व्ही आद्याक्षरामध्येच का उडतात असा प्रश्न तुम्हाला पडू शकतो.

पक्ष्यांवर झालेल्या संशोधनानुसार, पक्षी हवेत उडताना त्यांच्या थव्याचा आकार व्ही आद्याक्षराप्रमाणे का दिसतो यामागे दोन प्रमुख कारणे आहेत. यातील पहिले कारण म्हणजे या आकारामुळे थव्यातील प्रत्येक पक्षी हा व्यवस्थितपणे उडू शकतो. आपल्या समूहातील अन्य सदस्यांना तो आदळत नाही. दुसरं कारण हे समूहाच्या प्रमुखाशी निगडीत आहे. थव्यातील प्रमुख पक्षी हा सर्वात पुढे उडत दिशा ठरवत असतो. त्याच्यामागे बाकीचे पक्षी उडत असतात. प्रमुखाला फॉलो करता यावे यासाठी पक्षी 'V' आकारामध्ये उडत असतात. अनेक वैज्ञानिकांनी या दुसऱ्या कारणाशी सहमती दर्शवली आहे.

लंडन यूनिव्हर्सिटीमधील रॉयल वेटरनरी कॉलेजचे प्राध्यापक जेम्स उशरवुड यांनी यावर आपले मत मांडले आहे. या आकारामुळे हवेत एकत्र उडताना तोल सावरण्यासाठी मदत होते असे जेम्स यांनी म्हटले आहे. काही संशोधकांच्या मते, पक्ष्यांच्या समूहाच्या प्रमुखाव्यतिरिक्त अन्य सदस्यही थव्यात सर्वात पुढे उडू शकतात. काही पक्षांच्या प्रजातींमध्ये समूहाच्या प्रमुख पदावर सर्व सदस्यांचा समान अधिकार असतो. जो पक्षी सर्वप्रथम उडायला सुरुवात करतो, तो सर्वात पुढे राहतो आणि बाकीचे त्याच्यामागे जातात. जर थव्यात पुढे असलेला पक्षी थकला, तर त्याची जागा दुसरा पक्षी घेतो.

### शेतकरी आणि त्याची मुले

एक म्हातारा शेतकरी अगदी मरावयास टेकला, तेव्हा त्याने आपल्या सगळ्या मुलांस जवळ बोलावून सांगितले की, 'मुलांनो, मी माझी सगळी शेते आणि बागा तुमच्या स्वाधीन करीत आहे. या जमिनीत कोठे तरी पैसा पुरलेला असून तो हातभर जमीन खणली असता मिळेल.' इतके बोलून तो शेतकरी मरण पावला.

त्याच्या मुलांस वाटले की, आपल्या बापाने पुष्कळसे द्रव्य शेतात कोठे तरी पुरून ठेवले असावे. मग ते द्रव्य मिळविण्याच्या इच्छेने त्यांनी सगळी शेते चांगली खोल खणून पाहिली, परंतु द्रव्य सापडले नाही.

तथापि जमीन चांगली खणून निघाल्यामुळे, त्या वर्षी शेतात पुष्कळच चांगले पीक आले. ते पाहताच, आपल्या बापाच्या सांगण्याचा अर्थ काय होता हे त्या मुलांच्या चांगले लक्षात आले व त्यानंतर त्यांनी जमिनीची चांगली मशागत करण्याचा क्रम चालू ठेवला आणि सधन झाले.

तात्पर्य - प्रत्यक्ष पैसा मिळाला म्हणजेच द्रव मिळाले असे समजू नये. धान्य पुष्कळ मिळाले तर तीही संपत्तीच होय असे समजण्यास हरकत नाही.

## रहमते दर्शन (भाग - १)



को जसवंत की दुर्घटना हो गई और सिर में चोट लगी। चोट बड़ी भयानक थी। अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थान में उसका ऑपरेशन हुआ। मैं रात को महाराज दर्शनसिंह जी के पास पहुँचा और अपने बेटे के जीवन की भीख माँगी। महाराज जी ने कहा, चिंता न करो, महाराज जी ठीक कर देंगे।

ऑपरेशन ठीक-ठाक हो गया। अगले दिन मैं फिर महाराज जी का धन्यवाद करने आश्रम गया। मुझे देखते ही महाराज जी ने कहा, अब फिक्र की कोई बात नहीं है। महाराज जी ने संकट दूर कर दिया है। लड़का अब ठीक हो जायेगा।

महाराज जी की अपार कृपा से अब वह लड़का आँखों का डॉक्टर है। यह सब उन्हीं की कृपा का फल है। मुझ में इतनी सामर्थ्य नहीं कि उनके गुणों का

### उनमें प्रभू बोलता था

बखान कर सकूँ। समय आने पर जसवंत की शादी भी हो गई और अब वे कुशलपूर्वक अपना जीवनयापन कर रहे हैं।

### उनमें प्रभू बोलता था

उनके वचन रामबाण थे लंगर में सेवा करते हुए एक महिला सेवादार का पाँव गर्म तवे से छू गया। उसका उपचार कराया, परन्तु बीमारी बढ़ती ही गई। यहाँ तक कि उसे जलने के कारण संक्रमण रोग (septic) हो गया। उसे अस्पताल में भरती कराया गया, परन्तु कोई आराम नहीं आया। महाराज जी को सूचित किया गया। महाराज दर्शनसिंह जी ने कहा, इसका प्राइवेट नर्सिंग होम में इलाज कराओ। सारा ख़र्चा आश्रम देगा ।

महाराज जी के आदेशानुसार उसे प्राइवेट नर्सिंग होम में दाखिल करा दिया गया। महाराज जी भी वहाँ उसे देखने आये। उसकी टाँग सूज कर काफी मोटी हो गई थी। महाराज जी ने एक चादर की तह करके उसके टाँग पर रख दी और आशीर्वाद देकर वापिस आश्रम चले गये। उसी क्षण से वह स्त्री आराम का अनुभव करने लगी और कुछ दिन पश्चात ठीक होकर घर चली गई।

एक बार हमारे एक रिश्तेदार की दुर्घटना में टाँग टूट गई । उसे अस्पताल ले गये । प्लास्टर किया परन्तु जब निश्चित समय पर प्लास्टर खोला तो टाँग अभी जुड़ी नहीं थी। दोबारा प्लास्टर किया गया परन्तु कोई फायदा नहीं हुआ। तीसरी बार जब प्लास्टर होना था तो मैंने उन्हें महाराज दर्शनसिंह जी को चिट्ठी के द्वारा दया की प्रार्थना करने के लिए कहा। उन्होंने चिट्ठी लिख दी। मैं वह चिट्ठी लेकर आश्रम आ गया। जब मैंने महाराज जी को वह चिट्ठी दी, तो उन्होंने वह चिट्ठी

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

अनाहत चक्र ५

अनाहत चक्र वायु तत्व से जुड़ा है। वायु तत्व इस चक्र पर बहुत गहरा प्रभाव डालता है। इस लिये हमें वायु तत्व के बारे जानना बहुत जरूरी है। जीवित रहने के लिये वायु आवश्यक तत्व है। यदि एक मिनट वायु न मिले तो हम बेचैन हो उठते हैं। ज्यादा देर हवा न मिले तो हमारी डेथ हो सकती है। वायु आवश्यक भोजन तत्व है। हम बड़ी मात्रा में वायु खाते रहते हैं। हम एक मिनट में १६ से १८ सांस लेते हैं और एक सांस में २५-३० घन इंच हवा ले लेते हैं। सारे दिन में ३३ से ३६ पौंड हवा ले लेते हैं।

सांस लेने में १०० मांसपेशीयां काम करती हैं। प्रति दिन भोजन और जल से ७ गुणा हवा लेते हैं। सांस द्वारा जो वायु लेते हैं वह फेफड़ों में १५ वर्ग फुट से अधिक चक्र काटती है। फेफड़ों में हर समय ६० घन इंच हवा रहती है तथा २५-३३ घन इंच सांस छोड़ते समय बाहर निकालते हैं। वायुमंडल पृथ्वी के ३०० मील तक फैला हुआ है। इस वायुमंडल में अधिकतर जल, नाइट्रोजन और आक्सीजन है। इस में कार्बनडाईओकसाइड और धूल कण भी हैं। नाइट्रोजन शरीर के लिये बेकार है जैसे आती है वैसे

### अनाहत चक्र

ही लौट जाती है। आक्सीजन वायु शरीर में जाते ही फेफड़ों द्वारा रक्त में मिल जाती है। तथा हृदय रक्त को शरीर की प्रत्येक कोशिका तक पहुंचा देता है। जिस से कोशिका को शक्ति मिलती है। इसी आक्सीजन में हमारे संकल्प भी मिल जाते हैं और प्रत्येक कोशिका को प्रभावित करते हैं। सकारात्मक संकल्प से प्रत्येक कोशिका को बल मिलता है और नकारात्मक संकल्पों से प्रत्येक कोशिका कमजोर होती है। इन्ही संकल्पों में भगवान का बल भी पहुंच जाता है, अगर हम ध्यान योग का अभ्यास करते हैं। भगवान से प्राप्त बल द्वारा बीमार कोशिका का पुनर्निर्माण होता है जैसे गर्भ में होता है।

गायन है हर पल हर सांस भगवान का सिमरन करना चाहिये और १ से ३ मिनिट के अन्दर हर संकल्प का प्रभाव प्रत्येक कोशिका पर पड़ता है। नीले गंदे रक्त से कार्बनडाइआक्साइड बाहर निकलती है। नाइट्रोजन वायु चर प्राणी नहीं लेते सिर्फ पेड़ पौधे ग्रहण करते हैं।

ऑक्सीजन की विशेषता है यह जलती है। जहां भी कोई आग जलती है, भोजन खराब या बासी होता है समझो ये सब आक्सीजन ने किया। जो हम सांस लेते हैं उसमें जल और नाइट्रोजन होती है। नाइट्रोजन आक्सीजन को जलने नहीं देती।

आक्सीजन शरीर की हर कोशिका में पहुंच कर जलने का कार्य करती है जिस से गर्मी पैदा होती है और शरीर का तापमान बना रहता है। हवा में परम उपयोगी ओजोन गैस मिली रहती है। ओजोन गैस की गंध बहुत तीव्र होती है। ओजोन गैस केवल जंगल उपवन, पहाड़ और समुन्द्र किनारे की हवा में पाई जाती है। क्षय रोगियों की रक्षा पहाड़ पर इसी ओजोन गैस से होती है। वायु की शुद्धि अग्नि से होती है इसलिये यज्ञ का विधान । हवा को शुद्ध करने लिये हर रोज दीपक (जोत) जलाने का नियम भी है। वायु को प्राण कहते हैं क्योंकि इसके बगैर हम जिंदा नहीं रह सकते। जैसे हम नाक से सांस लेते हैं, ऐसे ही हमारा शरीर अपनी त्वचा से भी सांस लेता है। हर समय शरीर को कपड़ो से ढके रहने कारण पूर्ण आक्सीजन नहीं मिलती और त्वचा के छिद्र बंद हो जाते हैं। जिस से हृदय समस्या, कब्ज समस्या वा शुगर का रोग हो जाता है।

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

शिक्षिका : तुमचा बंडू वर्गात खूप वाईट शिव्या देतो
बंडूची आई : असू द्या बाई,
तो लहान आहे मोठा झाला की देईल चांगल्या.

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* कतार देशास स्वातंत्र्य कधी मिळाले?

- ३ सप्टेंबर १९७१

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आयुर्वेदीय बालसंस्कार

* पुंसवन संस्कार -

आयुर्वेदामध्ये इच्छित संतती प्राप्त होण्यासाठी पुंसवन संस्कार सांगितलेला आहे. गर्भधारणेपूर्वी पुंसवन संस्कार केला जातो. गर्भधारणा झाल्यानंतर ४५ दिवसांपासून पुढे हा संस्कार केला जातो. यामध्ये डाव्या किंवा उजव्या नाकपुडीमध्ये औषधीयुक्त रस टाकला जातो.

आपले बालक हे वीर्ययुक्त, ओजसयुक्त, दीर्घायषी, बद्धिमान, सारवान, तेजस्वी होण्यासाठी पुंसवन संस्कार दूर्वारसाने किंवा वटांकुररसाने करावा. अल्पबुद्धी असणाऱ्या दांपत्याचे बाळसुद्धा या संस्काराने बुद्धिमान होते.

* सीमंतोन्नयन संस्कार -

आधुनिक काळात या संस्कारालाच डोहाळजेवण असे म्हणतात. हा संस्कार केल्यामुळे गर्भवतीच्यामार्फत गर्भ स्वतःच्या इच्छा पूर्ण करीत असतो.

### षोडश संस्कार (सोळा संस्कार)

**मातृजं हास्य हृदयं मातुश्चं हृदयेन तत् ।**
**सम्बद्धं तेन गर्भिण्या नेष्टं श्रद्धाविधारणम् ।**

म्हणजेच गर्भाचे हृदय मातेच्या अंशापासून बनलेले असल्यामुळे मातेच्या हृदयाशी त्याचा संबंध असतो, म्हणून गर्भवतीचे व बाळाचे मन आनंदी, प्रसन्न राहण्यासाठी हा सीमंतोन्नयन संस्कार केला जातो. चौरस आहारामुळे मातेची तब्येत चांगली राहते व त्यामुळे बालकाची शारीरिक व मानसिक वाढ चांगली होते.

*** जातकर्म संस्कार -**

प्रसूतीनंतर बाळाची प्रतिकारशक्ती वाढविण्यासाठी व त्याची बौद्धिक वाढ करण्यासाठी मधातून सुवर्ण चाटविणे, औषधीसिद्ध जलाने स्नान घालणे, आईच्या स्तनांमध्ये निर्माण होणारा चिकट स्राव (कोलोस्ट्रम) बाळाला पाजणे, हे बाळाच्या आरोग्याच्या दृष्टीने फार महत्त्वाचे असते. या सर्व कृतींना जातकर्म संस्कार म्हणतात. याचे विस्तृत वर्णन नवजात बाळाची परिचर्यामध्ये केले आहे.

*** नामकरण संस्कार -**

बाळाचा जन्म झाल्यानंतर पुढील आयुष्यात त्याची विशिष्ट नावाने ओळख होणे जरुरीचे असते. त्या नावावरून त्याला यशप्राप्ती, दीर्घायुष्य मिळण्यासाठी शुभदिवशी अर्थपूर्ण नाव ठेवले जाते. यालाच नामकरण संस्कार म्हणतात.

**दशमे दिवसे पूर्णे विधिभि: स्वकुलोचित:।**
**कास्येत्सूतिकोत्यानं नामबालस्य यार्चितम् ।।**
**विभ्रतोड्.गैऽर्मनोन्हादरोच नागुरुचन्दनम् ।**
**नक्षत्रदेवतायुक्त बान्धवं वा समाक्षरम् ।।**

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडूळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# खेलो इंडिया बीच गेम्स स्पर्धेमध्ये अहिल्यानगरच्या ओम दंडवते याची महाराष्ट्र फुटबॉल संघासाठी निवड



नगर - दीव-दमण येथे १९ मे पासून सुरु होणाऱ्या खेलो इंडिया बीच गेम्स २०२५ स्पर्धेमध्ये सहभागी होणाऱ्या महाराष्ट्र बीच फुटबॉल संघात अहमदनगर जिल्हा फुटबॉल संघटनेचा खेळाडू ओम साहेबराव दंडवते याची निवड झाली आहे.

अलिबाग (जि. रायगड) येथे ७ ते ९ मे दरम्यान पार पडलेल्या महाराष्ट्र राज्य बीच फुटबॉल निवड चाचणीमधून खेलो इंडिया स्पर्धेसाठी १२ खेळाडूंची निवड करण्यात आली आहे. निवड झालेल्या खेळाडूंचे प्रशिक्षण शिबिर मुंबई येथे १३ तारखेपासून सुरु झाले असून, ते १८ मे पर्यंत चालणार आहे.

ओम दंडवते याने अहमदनगर जिल्हा फुटबॉल संघटनेद्वारे आयोजित केलेल्या जिल्हा फुटबॉल लीगमध्ये कराळे क्लब हाऊस संघाचे प्रतिनिधीत्व केले आहे. तसेच वरिष्ठ राज्य अजिंक्यपद फुटबॉल स्पर्धेमध्ये अहिल्यानगर जिल्हा संघाचे प्रतिनिधीत्व केले आहे. दंडवते याची महाराष्ट्राच्या संघात निवड झाल्याबद्दल अहमदनगर जिल्हा फुटबॉल संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया, वरिष्ठ उपाध्यक्ष मनोज वाळवेकर, उपाध्यक्ष खालिद सय्यद, अमरजितसिंग शाही, जोगासिंग मिन्हास, सचिव रोनप फर्नांडिस, सह-सचिव प्रदीप जाधव, व्हिक्टर जोसेफ, राजू पाटोळे, खजिनदार रिशपालसिंग परमार व इतर सर्व सभासदांनी अभिनंदन केले व त्याला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# समर कॅम्पमुळे मुलांचा शारीरिक व बौद्धिक विकास होतो

## संभाजी पवार यांचे प्रतिपादन; केडगाव स्पोर्टस् अकॅडमीच्या उन्हाळी शिबिराला विद्यार्थ्यांचा प्रतिसाद



केडगाव स्पोर्टस् अकॅडमीच्या उन्हाळी शिबिराला विद्यार्थ्यांचा प्रतिसाद मिळाला.

नगर - केडगाव स्पोर्टस् अकॅडमीने उन्हाळी शिबिरात मुलांना मोबाईल व टीव्हीपासून दूर ठेवले. त्यांच्या शारीरिक व बौद्धिक विकास करून घेतला. आज संस्कारक्षम पिढी घडविण्याची गरज निर्माण झाली आहे. विद्यार्थ्यांना घडविण्यासाठी शिक्षकांनी घेतलेल्या परिश्रमाचे व या उपक्रमाचे संभाजी पवार यांनी कौतुक केले.

केडगाव स्पोर्टस् अकॅडमी या संस्थेच्या वतीने ७ दिवसीय उन्हाळी शिबिर उत्साहात साजरे झाले. केडगावसह संपूर्ण शहरातून या शिबिरात विद्यार्थी सहभागी झाले होते. शिक्षकांनी विशेष परिश्रम घेऊन शिबिरात संस्कार, शिक्षण, हस्तकला, चित्रकला, सर्जनशीलता, भाषण, वक्तृत्व कलेचे विद्यार्थ्यांना धडे दिले.

एक विद्यार्थी खास छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यातून येऊन या शिबिरात सहभागी झाला होता. छबुराव कोतकर यांच्या संकल्पनेतून तर स्वाती बारहाते यांच्या मार्गदर्शनाखाली शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सहभागी विद्यार्थ्यांच्या शारीरिक दृष्टीने बास्केटबॉल, क्रिकेट, खो-खो, ट्रेकिंग सारखे खेळ घेण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ. सचिन आहेर म्हणाले की, मुलांचा शिक्षणाबरोबरच शारीरिक विकास होणे गरजेचे असून, अशा उपक्रमातून मुलांना चालना व व्यासपीठ मिळत असल्याचे सांगितले.

यावेळी मुख्याध्यापक संदीप भोर, डॉ. देवेशकुमार बारहाते, डॉ. बलराज पाटील, संस्थेचे अध्यक्ष बाबासाहेब कोतकर, छबुराव कोतकर, स्वाती बारहाते, पवन कोतकर, प्रा. प्रसाद जमदाडे, गुलाब कोतकर, आप्पा मतकर, विद्यार्थी, पालक आदी उपस्थित होते. या उन्हाळी शिबिरसाठी केडगावच्या ज्ञानसाधना गुरुकुल क्लासेसच्या वतीने मुलांना आकर्षक बक्षीसं देण्यात आले. स्वाती बारहाते यांनी सूत्रसंचालन केले. छबुराव कोतकर यांनी आभार मानले.

# सत्तावीस वर्षांच्या पुनर्भेटीने सुखावले गुरू-शिष्य

## पाडळी येथील न्यू इंग्लिश स्कूलच्या माजी विद्यार्थ्यांचा नगरमध्ये स्नेहमेळावा उत्साहात



पाडळी येथील न्यू इंग्लिश स्कूलच्या माजी विद्यार्थ्यांचा नगरमध्ये स्नेहमेळावा उत्साहात झाला.

नगर - प्रचंड उत्सुकतेनंतर तब्बल २७ वर्षांनी एकत्रित झालेली सवंगड्यांची भेट... डोळ्यात आलेले आनंदाश्रू... एकमेकांची विचारपूस... तत्कालीन गुरूजनवर्गांना पाहून भारावलेले मन... आणि नंतर हास्यकल्लोळात झालेला संवाद सर्वांनाच सुखावून गेला... निमित्त होते न्यू इंग्लिश स्कूलच्या (पाडळी, ता. पाथडी) येथील १९९७-९८ सालच्या माजी विद्यार्थ्यांच्या स्नेहमेळाव्याचे...

नियोजनाप्रमाणे सर्व विद्यार्थी व शिक्षक यांना कार्यक्रमाचे निमंत्रण देण्यात आले. ठरल्याप्रमाणे अहिल्यानगर मधील स्वस्तिक चौक येथील हॉटेल रेडियन्स येथे विद्यार्थी जमा होऊ लागले. आलेल्या सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांचे स्वागत फेटे बांधून करण्यात आले. तब्बल २७ वर्षांनी झालेल्या भेटीमुळे विद्यार्थ्यांबरोबर शिक्षकही भारावून गेले होते. प्रत्येक विद्यार्थ्याने आपापला परिचय करून दिला. सर्वजण जुन्या आठवणींमध्ये हरवून गेले. या वेळी शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या वेळी तत्कालीन मुख्याध्यापक संजय भापसे सर, वरिष्ठ शिक्षक लक्ष्मण भापकर सर, बी. डी. मरकड सर, युनूस शेख सर, अण्णासाहेब आमटे सर, अर्जुन चितळे सर, सुभाष गव्हाणे सर, जिवडे सर, भगवान कारखेले सर, विद्यमान मुख्याध्यापक विनायक कचरे सर, विष्णू कचरे यांच्यासह माजी विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

तत्कालीन मुख्याध्यापक भापसे सर म्हणाले की, आजचा दिवस खूप आनंदाचा आहे. विद्यार्थ्यांनी उत्तम नियोजन करून सर्वांची घडवून आणलेली भेट कायम स्मरणात राहील. जीवनात प्रत्येकाने केवळ पैशांच्या मागे न धावता समाधानी राहावे. आणि एखाद्या कार्यक्रमाचे नियोजन कसे करावे तर ते या बॅच कडून शिकावे असे बोलून विद्यार्थ्यांना उत्तेजित केले. यावेळी आमटे सर, चितळे सर, शेख सर या शिक्षकांनीही मनोगत व्यक्त केले. सर्व शिक्षकांचा शाल, सन्मानपत्र, बुके देऊन यथोचित सन्मान केला. उपस्थित सर्वांनी स्नेहभोजनाचा मनसोक्त आनंद घेतला.

कार्यक्रमाचे नियोजन विजय कांबळे, अजित ढमाळ, प्रवीण कुलकर्णी, श्रीकांत देवकर, संदीप भोरडे, विनोद ताठे, वसंत कर्डिले, सचिन कांबळे, बबन केदार, संतोष खोरदे, शिवाजी गर्जे, अश्विनी कुलकर्णी, वैशाली घालमे, मंगल ताठे, यांनी केले. पर्यावरणाचे महत्त्व लक्षात घेऊन विद्यार्थी-शिक्षकांना अजित ढमाळ यांच्याकडून आंब्यांच्या रोपांचे वाटप करण्यात आले. प्रास्ताविक विजय कांबळे यांनी केले. सूत्रसंचालन श्रीकांत देवकर, रोहिणी कुलकर्णी, प्रवीण कुलकर्णी आणि अश्विनी कुलकर्णी यांनी केले. संदीप भोरडे यांनी आभार मानले.

# नगरचे ब्रह्माकुमार डॉ. दीपक हरके यांना रशियामध्ये 'ग्लोबल लिडर अॅवॉर्ड' प्रदान



डॉ. दीपक हरके यांना रशियामध्ये ग्लोबल लिडर अवॉर्ड प्रदान करण्यात आले.

नगर - रशियातील सेंट पिट्सबर्गमध्ये सिटीटेल हॉटेलमध्ये आयोजित केलेल्या ग्लोबल ईकॉनॉमिक फोरम समिट मध्ये जगभरात १४३ देशात ८५०० हून अधिक सेवाकेंद्राच्या माध्यमातून निशुल्क ध्यानधारणा शिकविणाऱ्या प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाचे ध्यानधारणा प्रशिक्षक ब्रह्माकुमार डॉ. दीपक हरके यांचा जगभरात भारताच्या प्राचीन राजयोगाचा प्रचार व प्रसार केल्याबद्दल प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या सेंट पिटर्सबर्ग रिट्रिट सेंटरच्या डायरेक्टर बीके संतोष दीदी व मिस रशिया वालेरिया मिर यांच्या हस्ते ग्लोबल लिडर अवॉर्डने सन्मान करण्यात आला. यावेळी ब्रिक्स चे सदस्य उद्योजक अॅन्ड्र्यू चिरवा उपस्थित होते.

डॉ. दीपक हरके हे १८३ विश्वविक्रम करणारे १ ले भारतीय आहेत. तसेच त्यांनी विविध विश्वविक्रम हे भारताच्या प्राचीन राजयोगाचा प्रसार करण्यासाठी केले आहेत. यापूर्वी ही डॉ. दीपक हरके यांना देशात व परदेशात विविध पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. त्यांना लंडन मध्ये विविध ८ पुरस्कार मिळाले आहेत. यामध्ये ब्रिटिश पार्लियामेंट व ऑक्सफर्ड विद्यालयात त्यांना विशेष सन्मानित करण्यात आलेले आहे. लंडन बरोबरच त्यांना दुबईमध्ये विविध ५ पुरस्कारांनी, बँकॉक येथे ३ पुरस्कारांनी, नेपाळ येथे २ पुरस्कारांनी तसेच स्वित्झर्लंड, मलेशिया व श्रीलंकेमध्ये ही विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आलेले आहे. त्यांच्या कार्याची दखल मार्च २०२० मध्ये विश्वविख्यात फोर्ब्स मासिकाने घेतली आहे. बीके डॉ. दीपक हरके हे महाविद्यालयात शिक्षण घेत असताना या संस्थेच्या संपर्कात आले व नंतर त्यांनी स्वतःचे संपूर्ण जीवन या कार्यासाठी समर्पित केले. आता ते पूर्णवेळ ध्यानधारणेचा प्रचार व प्रसार करण्याचे कार्य जगभरात करत आहेत.




नगर जिल्ह्यातील श्रीनिवास कळमकर यांना मुंबई येथे कामगार भूषण पुरस्काराने सन्मानित करताना राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन.

# कामगार भूषण पुरस्काराने श्रीनिवास कळमकर सन्मानित

नगर -२०२३ चा वर्षाचा कामगार भूषण पुरस्कार श्रीनिवास कळमकर यांना राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते मुंबई येथे प्रशस्तीपत्र, स्मृतीचिन्ह आणि रोख ५० हजार रुपये असे पारितोषिक देऊन सन्मानीत करण्यात आले.

राज्य शासनाच्या महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाकडून दिले जाणारे कामगार भूषण व विश्वकर्मा गुणवंत कामगार पुरस्कार २०२३ कामगार मंत्री अॅड. आकाश फुंडकर यांनी जाहीर केले होते.

कामगार भूषण पुरस्कारासाठी छत्रपती संभाजीनगर येथील बजाज ऑटो लिमिटेड कंपनीत कार्यरत कामगार श्रीनिवास कोंडिबा कळमकर यांची निवड करण्यात आली. ते पारनेर तालुक्यातील भाळवणी येथील रहिवाशी आहे. कामगारांसाठी असलेल्या या सर्वोच्च पुरस्कारासाठी राज्यातून केवळ एका कामगाराची निवड केली जाते.

या पुरस्काराबाबत त्यांचे अभिनंदन होत आहे.

# मानवी तस्करीविरोधात एकत्र येण्याची गरज

## पोलीस उपअधीक्षक गणेश उगले यांचे प्रतिपादन; बाल न्याय अधिनियम व वेठबिगार मुक्तीवर जिल्हास्तरीय कार्यशाळा



बाल न्याय अधिनियम व वेठबिगार मुक्तीवर जिल्हास्तरीय कार्यशाळा नुकतीच नगरमध्ये पार पडली.

नगर - समाजात वेगाने वाढणारी मानवी तस्करी ही एक गंभीर सामाजिक समस्या बनली असून, तिचा बंदोबस्त करण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाने पुढाकार घेणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन विभागीय पोलीस उपअधीक्षक गणेश उगले यांनी केले.

जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय आणि श्री अमृतवाहिनी ग्रामविकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मानवी तस्करी व बाल न्याय अधिनियमविषयक कार्यशाळेच्या उद्घाटनाप्रसंगी उगले बोलत होते. ही कार्यशाळा अहिल्यानगर येथील पोलीस रिक्रेशन हॉलमध्ये आयोजित करण्यात आली होती.

पुढे उगले म्हणाले की, मानवी तस्करी रोखण्यासाठी केवळ पोलिसच नव्हे, तर प्रत्येक नागरिकाने सजग राहणे गरजेचे आहे. समाजातील प्रत्येक घटकाची जबाबदारी आहे, की कोणतीही शंका आल्यास तत्काळ पोलीस प्रशासनास माहिती कळविण्याचे त्यांनी आवाहन केले.

कार्यशाळेत बालकल्याण समितीचे अध्यक्ष अॅड. जयंत ओहळ यांनी बालकल्याण समितीची रचना व भूमिका विषद केली.

जिल्हा बालसंरक्षण अधिकारी वैभव देशमुख यांनी बाल न्याय (मुलांचे काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ यावरील सविस्तर माहिती दिली.

विशेष बाल पोलीस पथकाचे पोलीस निरीक्षक राजेंद्र इंगळे यांनी बालांचे लैंगिक गुन्हे संरक्षण कायदा २०१२ (पोस्को) यावर विवेचन केले.

अॅड. अनुराधा येवले यांनी पिटा व पोस्को कायद्याचे सखोल विश्लेषण केले.

इंटरनॅशनल जस्टीस मिशनचे गोरख जाधव यांनी मानवी तस्करी व वेठबिगार प्रकरणांची उदाहरणांसह चर्चा केली.

कार्यशाळेअखेर मानवी तस्करी व वेठबिगार मुक्तीची सामूहिक शपथ घेण्यात आली. कार्यशाळेत जिल्ह्यातील सुमारे ६० पोलीस अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शुभांगी माने यांनी केले. पोलीस निरीक्षक इशामोद्दीन पठाण यांनी आभार प्रदर्शन केले.

या कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी भरोसा सेलचे हेड कॉन्स्टेबल उमेश इंगोले, महिला व बालविकास दीपा आटोळे (एल एच सी), अर्चना काळे (एएचटीयू), ए.के पवार (एलएचसी), एस.ए. सय्यद (एएचटीयू), श्री अमृतवाहिनी ग्रामविकास मंडळाचे मानवी तस्करी व वेठबिगार मुक्ततेचे जिल्हा समन्वयक सिराज शेख, अंबादास गुंजाळ, राहुल साबळे, संध्या कुलकर्णी, मंगेश थोरात, मयुरी वनवे यांनी परिश्रम घेतले.

# एमपीएससी परिक्षेतून क्लास वन अधिकारीपदी मोहित बारगळ याची निवड



नगर - येथील मोहित अजयकुमार बारगळ याची एमपीएससी परीक्षेतून क्लास वन अधिकारी पदी निवड झाली. नुकत्याच झालेल्या एमपीएससी परीक्षेत अभियांत्रिकी विभागात त्याने १११ वा क्रमांक मिळवला आहे.

मोहित बारगळ पिंपळगाव माळवी (ता. नगर) येथील असून, त्याने स्ट्रक्चर मधून पोस्ट ग्रॅज्युएट केले आहे. त्याचे इंजिनिअरिंगचे शिक्षण विखे पाटील इंजिनिअरिंग कॉलेज विळद घाट येथून पूर्ण झाले आहे. लहानपणापासून अभ्यासात हुशार असलेला मोहित याने उच्च स्वप्न ठेवून छोटे-छोटे उद्दिष्ट पार करत क्लास वन अधिकारी होण्याचे यश मिळवले आहे. सध्या तो जलसंपदा उपविभाग उरळीकांचन या ठिकाणी स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक पदावर कार्यरत आहे.

मोहित हा रुपीबाई मोतीलालजी बोरा न्यू इंग्लिश हायस्कूलचे प्राचार्य अजयकुमार बारगळ यांचा मुलगा आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.



उपदेशक व इव्हॅन्जलिन बुथ हॉस्पिटल यांच्यावतीने आयोजित राज्यस्तरीय परिचारीका गौरव पुरस्कार वितरण सोहळा उत्साहात पार पडला.


# 'उपदेशक व इव्हॅन्जलिन बुथ हॉस्पिटल' आयोजित राज्यस्तरीय परिचारीका गौरव पुरस्कार वितरण सोहळा

नगर - परिचारीका दिनाचे औचित्य साधून उपदेशक व बुथ हॉस्पिटल अ.नगर यांच्या संयुक्त विद्यमाने परिचारीका गौरव पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रम शर्लि मिलर हॉल बुथ हॉस्पिटल या ठिकाणी झाला. सदर कार्यक्रमात महाराष्ट्रातून पन्नासहून अधिक परिचारीकांना परिचारीका गौरव पुरस्कार देऊन सन्मानीत करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्रीमती सुशिला श्रीसुंदर-संभाजीनगर या होत्या व उद्घाटक बुथ हॉस्पिटलचे प्रशासक मेजर देवदान कळकुंबे हे होते. प्रमुख उपस्थितीमध्ये मेजर ज्योती कळकुंबे, सौ. दिक्षा घाटविसावे, मेजर रविंद्र शेलार, ज्योती लोंढे, सौ. छाया जाधव, सौ. टि. टि. पॉल जाधव, सौ. सलोमी जाधव, सौ. मल्लीका साबळे, प्रा. प्रतुल कसोटे, प्रा. गायकवाड मॅडम, कॅप्टन डॅनिसन परमार आदि उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरूवात प्रार्थनेने व दिप प्रज्वलन करून झाली. प्रास्ताविक जॉर्ज क्षेत्रे यांनी केले.

यावेळी बुथ हॉस्पिटल नर्सिंग कॉलेजच्या विद्यार्थीनींनी गित व नृत्य सादर केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कुमारी स्नेहल सुर्यवंशी यांनी केले. विक्रम गायकवाड यांनी आभार मानले. शेवटची प्रार्थना प्रकाश लोखंडे यांनी केली. कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्याकरिता प्रवीण साबळे, शितल शिंदे, जयमाला केदारी, कविता गायकवाड आदिंनी परिश्रम घेतले.

# अहिल्यानगर येथील पोदार इंटरनॅशनल शाळेची हॅटट्रिक; सलग तिसऱ्या वर्षीही सीबीएसई बोर्डाचा शंभर टक्के निकाल


श्रुती देंडगे, प्रज्ञेश बुचुडे, अथर्व पाटील, सार्थक दौंड, समर्थ दौंड, प्रणव चौधरी, जान्हवी हनपुडे, वेदांत शिंदे, श्रेया डावरे, श्रीहान शिंदे, आशुतोष वलांडे

नगर – पोदार इंटरनॅशनल स्कूल, अहिल्यानगर सीबीएसई बोर्डाचा सन २०२४–२५ या वर्षातील इयत्ता दहावी बोर्डाचा निकाल शंभर टक्के लागला. शाळेतील श्रुती बाळासाहेब देंडगे हिने ९७.८०% गुण मिळवत प्रथम क्रमांक मिळवला तर प्रज्ञेश अमित बुचडे व अथर्व रणजीत पाटील या दोघांनी ९६.६०% गुण मिळवून द्वितीय क्रमांक पटकावला. सार्थक मुकेश दौड याने ९६.४०% गुण मिळवत तृतीय क्रमांक मिळविला. तसेच समर्थ मुकेश दौड ९६.२०%, प्रणव मंगेश चौधरी ९५.८०%, जान्हवी बाळकृष्ण हनपुडेपाटील ९५.२०%, वेदांत नारायण शिंदे ९५.००%, श्रेया साहेबराव डावरे ९५.००%, श्रीहान हरिश्चंद्र शिंदे ९४.८०%, आशुतोष शिवशंकर वलांडे ९१.००% या सर्व विद्यार्थ्यांनी विशेष उज्वल यश संपादन केले. तसेच अनेक विद्यार्थ्यांनी इंग्रजी, मराठी, हिंदी, विज्ञान, गणित, समाजशास्त्र, संगणक या सर्व विषयांमध्ये ९०% च्या वर गुण मिळविले.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे प्राचार्य मंगेश जगताप यांनी अभिनंदन केले व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. या सर्व विद्यार्थ्यांना प्राचार्य मंगेश जगताप, उपप्राचार्य शगुफ्ता काझी, शाळेचे सीनियर अ‍ॅडमिन ऑफिसर आशुतोष नामदेव व शाळेतील शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. शाळेचे प्राचार्य व सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# मातोश्री उर्दू हायस्कूलचा दहावीचा निकाल ९८ टक्के



खान बुशरा फिरोज, शेख हुमेरा एजाज, सय्यद सफीना रियाज

नगर – अहमदनगर येथील अलफलाह एज्युकेशन अ‍ॅण्ड वेलफेअर सोसायटी संचलित मातोश्री उर्दू हायस्कूल आलमगीर नागरदेवळे या विद्यालयाने यशाची परंपरा कायम राखली आहे. एसएससी परीक्षा मार्च–२०२५ च्या परीक्षेत विद्यालयाने ९८ टक्के निकाल प्राप्त केला आहे. एसएससी परीक्षेस विद्यालयातून ४३ विद्यार्थी प्रविष्ठ झाले होते. शाळेतील विद्यार्थिनी खान बुशरा फिरोज हिने ८६.८० टक्के गुण मिळवून विद्यालयात प्रथम क्रमांक मिळविला आहे, तर दुसऱ्या क्रमांकावर शेख हुमेरा एजाज हिने ७६ टक्के, सय्यद सफिना रियाज हिने ७५.२० टक्के गुण प्राप्त करून तिसरा क्रमांक प्राप्त केला.

यशस्वी विद्यार्थ्यांना संस्थेचे प्रमुख कार्यवाह प्रा.डॉ.शेख अब्दुस सलाम अब्दुल अजीज, मुख्याध्यापक शेख जमीर अहमद इस्माईल तसेच वर्गशिक्षिका खान सफिया सलीम, शेख महेनाज़ अ. सलाम, शेख एजाज अहमद अ. कुडूस, शेख अंजुम सत्तार यांचे मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल शेख अ. हसीब अ. सलाम, संस्थेचे सर्व पदाधिकारी तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी व शिक्षक–पालक संघाचे सदस्य, शिक्षक व शिक्षकेतर यांच्यासह ग्रामस्थ, पालकांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# दहावीच्या बोर्ड परीक्षेत 'कार्मेल कॉन्व्हेंट'चे यश


समीक्षा तोडकर, चिनार ठुबे, अथर्व लोंढे, राधिका कार्ले

नगर – अहिल्यानगर सन २०२४–२५ या वर्षात मार्च महिन्यात घेण्यात आलेल्या शालांत माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा २०२४–२५ चा निकाल १३/०५/२०२५ रोजी जाहीर झाला. यात भूषणनगर, केडगाव, अहिल्यानगर येथील कार्मेल कॉन्व्हेंट हायस्कूलचा दरवर्षीप्रमाणे याही वर्षी १००% निकाल लागला. यामध्ये तब्बल २४ विद्यार्थ्यांनी ९०% पेक्षा जास्त गुण प्राप्त केले आहेत. यापैकी अनुक्रमे प्रथम क्रमांकाने दोन विद्यार्थ्यांनी तोडकर समीक्षा व ठुबे चिनार यांस ९८.६०%, द्वितीय क्रमांक लोंढे अथर्व ९७%, तृतीय क्रमांक कार्ले राधिका ९६.६०% तर मोरे रुद्र ९५.८०%, आगरकर ग्रिष्मा हीस ९४.६०%, ढगे सृष्टी ९४.६०%, गिरवले तनिष्का ९४.२०%, शेख निहाल ९४.२०%, गवळी सई ९४%, पांडे विष्णू ९३.६०%, लंके अनुष्का ९३.२०%, लगड पूजा ९२.६०%, पांडे विधी ९१.८०%, लाटे प्रांजल ९१.८०%, कदम तनिष्का ९१.६०%, ताकते शरयू ९१.२०%, सुसारे शिवम ९१.२०%, डहाळे श्रावणी ९०.६०%, आंबेकर आदिती ९०.४०% होन सिद्धी ९०.४०%, शेख साद ९०.४०%, पठारे कल्याणी ९०.२०%, नट रागिनी ९०.२०% याप्रमाणे शाळेला यश मिळाले आहे.

शाळेच्या मॅनेजर सिस्टर अ‍ॅन टेरेस, मुख्याध्यापिका सिस्टर निशा जोसेफ व सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## अरणगावच्या माउंट लिटेरा झी स्कूलचा दहावी परीक्षेत १०० टक्के निकाल

नगर – माउंट लिटेरा झी स्कूल, दौंड रोड, अरणगाव या सीबीएसई शाळेने दहावीच्या बोर्ड परीक्षेत शंभर टक्के निकालाची उज्वल परंपरा कायम राखली आहे. सर्व विद्यार्थ्यांनी यशस्वीरीत्या परीक्षेत उत्तीर्ण होऊन शाळेचे नाव उज्वल केले आहे.

शाळेचे अध्यक्ष अ‍ॅड. सुनील लोटके व प्राचार्या सौ. शैलजा लोटके यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे तसेच त्यांच्या पालकांचे अभिनंदन केले. त्यांनी विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या आणि शाळेच्या प्रगतीसाठी सर्व शिक्षकवर्गाचे योगदान कौतुकास्पद असल्याचेही नमूद केले.

# श्री शाहू विद्या मंदीर खडांबेचा दहावीचा ८६.९१ टक्के निकाल

नगर – अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे श्री शाहू विद्या मंदीर खडांबे (ता. राहुरी) या विदयालयाचा मार्च २०२५ मध्ये परीक्षा झालेल्या इ.१० वी च्या बोर्ड परीक्षेचा निकाल ८६.९१ टक्के इतका लागला.

विद्यालयाचे १०७ पैकी ९३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. यामध्ये चि. वेदांत राहूल लोंढे ८९.०० टक्के (प्रथम), कु.रुमिजा ताहीर शेख ८९.०० टक्के (प्रथम), कु. आस्था राजेंद्र उगले ८८.०० टक्के (द्वितीय), कु.प्रिया अरुण उगले ८७.४० टक्के (तृतीय), चि.अथर्व रघुनाथ पठारे ८६.६० टक्के (चतुर्थ), चि.स्वयम अंकुश झुंजारे ८४.४० टक्के (पाचवा) यांनी क्रमांक मिळवले. यांचा सन्मान विदयालयाचे मुख्याध्यापक आप्पासाहेब शिंदे यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी त्यांचे पालक व शिक्षक उपस्थित होते.


दहावीच्या परिक्षेत यश मिळविणाऱ्या श्री शाहू विद्या मंदीर स्कूलमधील विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. (छाया – संदीप बांगर)

विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या या यशाबद्दल संस्था पदाधिकाऱ्यांसह शाळा व्यवस्थापन समिती, शिक्षक–पालक संघ, माजी विद्यार्थी संघ, पंचायत समिती सदस्य, सरपंच व सदस्य, चेअरमन व सदस्य, ग्रामस्थ तसेच सर्व शिक्षक – शिक्षिका व शिक्षकेतर सेवक यांनी अभिनंदन केले.

## महाराणी ताराबाई विद्यालयाची १०० टक्के निकालाची परंपरा कायम

नगर – केडगाव येथील महाराणी ताराबाई कन्या विद्यालयातील मुलींनी यावर्षी सुद्धा १०० टक्के निकालाची परंपरा कायम ठेवली. गौरी संतोषकुमार काळे ९७ टक्के गुण मिळवत विद्यालयात प्रथम आली. रिया प्रवीण बोरा व वैष्णवी संतोष औशिकर ९६.८० टक्के गुण मिळून द्वितीय आल्या. प्रणाली आदिनाथ शिंदे ९५.४० टक्के गुण मिळवून तिसरी आली. १४ मुलींना ९० टक्यापेक्षा जास्त गुण मिळाले. ५० मुलींनी ७५ ते ८९ टक्के गुण मिळवले. यशस्वी मुलींचे संस्थेचे सचिव बबनराव कोतकर, सहसचिव रावसाहेब सातपुते, अध्यक्ष रमेश गवळी, उपाध्यक्ष जाफर शेख, खजिनदार प्रल्हाद साठे तसेच विद्यालयाच्या प्राचार्या वासंती धुमाळ यांनी सर्व यशस्वी विद्यार्थिनींचे अभिनंदन केले.

## वर्का स्कूलचा दहावी परीक्षेचा १०० टक्के निकाल


सिद्धीका बोथरा, भक्ती जाधव, खुशी पात्रा

नगर– अरणगाव येथील वर्का चॅरिटेबल ट्रस्टच्या वर्का स्कूल अ‍ॅण्ड ज्युनिअर कॉलेजचा इयत्ता दहावीचा निकाल १०० टक्के लागला आहे.

यामध्ये सिद्धीका राहुल बोथरा ही विद्यार्थिनी ८७.२० टक्के गुण प्राप्त करून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाली. भक्ती दत्तू जाधव ही विद्यार्थिनी ८७ टक्के गुण प्राप्त करून द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण झाली आणि कुमारी खुशी अनुप पात्रा ही विद्यार्थिनी ८६.६० टक्के गुण प्राप्त करून तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाली.

या यशाबद्दल वर्काचा चॅरिटेबल ट्रस्टच्या अध्यक्षा श्रीमती रुहिया, मुख्याध्यापक डॉ. रामीन हुसेन, उपमुख्याध्यापिका शबनम खान यांनी सर्व उत्तीर्ण विद्यार्थी व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे अभिनंदन केले.

# ज्ञानसंपदा शाळेची शंभर टक्के निकालाची उज्वल परंपरा कायम

नगर – सन २०२४–२५ या शैक्षणिक वर्षात एस.एस. सी बोर्ड परीक्षेत तपोवन रोडवरील उपक्रमशील शाळा म्हणून ओळखली जाणारी ज्ञानसंपदा शाळेनी शंभर टक्के निकालाची उज्वल परंपरा कायम राखत विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले. विद्यार्थ्यांच्या या उत्तुंग यशामागे संस्थेचे विश्वस्त, मुख्याध्यापिका, शिक्षक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी व पालक वर्ग यांचा सिंहाचा वाटा आहे. अनुभवी शिक्षकांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीचा उच्चांक यावर्षीचा अतिशय अभिमानास्पद आहे. त्यामुळे शंभर टक्के निकाल लागण्याची परंपरा आजही अखंडित व कायम आहे.

या शैक्षणिक वर्षातील निकालात आर्या गोसावी हिने ९७.४०% गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. तर ऋचा शेपाळ हिने ९६.८० गुण मिळवत द्वितीय क्रमांक मिळवला. दिया अडसुरे हिने ९६.२०% गुण मिळवत तृतीय तर ऐश्वर्या मांडके ९६% गुण मिळवत चौथा क्रमांक मिळवला. तर संचित कोतकर यांनी ९४.८०% गुण मिळवत पाचवा क्रमांक पटकावला.


एस.एस. सी बोर्ड परीक्षेत तपोवन रोडवरील ज्ञानसंपदा शाळेनी शंभर टक्के निकालाची उज्वल परंपरा कायम राखत विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. समवेत मुख्याध्यापिका सौ. शिवांजली अकोलकर व शिक्षकवृंद. (छाया – उदय जोशी)

यावर्षी परीक्षेस एकूण ६७ विद्यार्थी बसले होते त्यापैकी ९०% च्या पुढे २१ विद्यार्थी पात्र ठरले तसेच ८० ते ८९ या टक्क्यांच्या दरम्यान २७ विद्यार्थी पात्र ठरले.

निकालाची विषयनिहाय सरासरी खालील प्रमाणे इंग्रजी ७९.८२. हिंदी संस्कृत ८०. २५, मराठी ८३.१९. गणित ७९. ७३, विज्ञान ८४.७५, सामाजिक शास्त्र ८२.९२ अशी आहे.

विद्यार्थ्यांच्या या घवघवीत यशासाठी संस्थेचे अध्यक्ष प्रवीण बजाज, उपाध्यक्ष मिलिंद गंधे, मानद सचिव अरुण कुलकर्णी, खजिनदार अविनाश बोपर्डीकर, स्कूल कमिटी चेअरमन कारभारी भिंगारे, श्रीहरी टिपूगडे, सुमित सोनवणे, विनोद बजाज, अक्षय वाघमोडे, मुख्याध्यापिका सौ. शिवांजली अकोलकर यांनी यशस्वी विद्यार्थी व शिक्षकवृंद, पालकांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## डॉ.पाऊलबुधे विद्यालयाचा दहावीचा ९४ टक्के निकाल

नगर – अहिल्यानगर येथील वसंत टेकडी जवळील सेवा शिक्षण प्रसारक मंडळाचे डॉ. ना. ज पाऊलबुधे माध्यमिक विद्यालयाचा एसएससी २०२४–२५ चा निकाल ९४% निकाल लागला आहे. दरवर्षीप्रमाणे उत्कृष्ट निकालाची परंपरा विद्यालयाने कायम ठेवली आहे.

मार्च २०२४ –२५ परीक्षेत ११८ विद्यार्थी बसले होते. त्यापैकी १११ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. फक्त सात विद्यार्थी अनुत्तीर्ण झाले आहेत. विद्यालयात प्रेम गर्जे ९३.८०% गुण मिळवून प्रथम आला तर आदित्य रासकर ९२.६०% गुण मिळवून दुसरा तर साईराज पवार हा ९१.४०% गुण मिळवून तिसरा आला आहे.

या तिन्ही विद्यार्थ्यांसह सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष विनय पाऊलबुधे, उपाध्यक्ष रामभाऊ बुचकूल, सचिव रामकिसन देशमुख, सर्व संचालक, माजी प्राचार्य भरत बिडवे, मुख्याध्यापिका विजया नवले, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आदींनी अभिनंदन केले आहे.

# स्नेहालय संचलित बालभवनच्या विद्यार्थ्यांचे बोर्ड परीक्षेत उज्वल यश

## सेवावस्तीतील ४३ विद्यार्थी यशस्वी; अमन शेख ८१.२०% गुणांसह प्रथम

नगर – स्नेहालय संस्थेच्या बालभवन प्रकल्पातील विद्यार्थ्यांनी यंदाच्या दहावीच्या बोर्ड परीक्षेत अपवादात्मक यश संपादन करत सेवावस्तीतील शिक्षणप्रेमाचे नवसंकेत उभारले आहेत. प्रतिकूल परिस्थितीत राहूनही या विद्यार्थ्यांनी केवळ नियमित अभ्यास व जिद्दीच्या जोरावर ७२.३१% इतका एकूण निकाल मिळवला आहे.



स्नेहालय संचलित बालभवनच्या विद्यार्थ्यांनी बोर्ड परीक्षेत उज्वल यश मिळविले.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांच्यामार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेत एकूण ६९ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. त्यापैकी ४३ विद्यार्थ्यांनी यशस्वीरीत्या उत्तीर्ण होत बालभवनचा नावलौकिक वाढवला आहे. विशेष बाब म्हणजे कोणत्याही खाजगी क्लासशिवाय या विद्यार्थ्यांनी हे यश प्राप्त केले आहे.

यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये शेख अमन अमिर (मलाला बालभवन) याने ८१.२०% गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला आहे. त्याच्या पाठोपाठ सुहाना फिरोज खान (ऊर्जा बालभवन) हिने ७०.००% गुणांसह द्वितीय, तर गौरवी नितीन क्षीरसागर (कलाम बालभवन) हिने ६९.८०% गुणांसह तृतीय क्रमांक पटकावला आहे.

या विद्यार्थ्यांनी स्नेहालयच्या बालभवन प्रकल्पाच्या शैक्षणिक, आरोग्य, संस्कार व रोजगार केंद्रित उपक्रमाचा लाभ घेत यश संपादन केले आहे. विद्यार्थ्यांना नियमित मार्गदर्शन करणारे शिक्षक, समर्पित स्वयंसेवक आणि प्रेरणादायी वातावरण यामुळे हे यश शक्य झाले, असे संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले. बालभवन टीमने यशस्वी विद्यार्थ्यांना पेढे भरवून अभिनंदन व शुभेच्छा दिल्या.

स्नेहालयच्या अध्यक्षा जयाताई जोगदंड, सचिव डॉ. प्रीती भोंबे, मानद संचालक वैशाली चोपडा, आणि संचालक हनीफ शेख यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले

# पी. ए. इनामदार इंग्लिश मिडियम स्कूलचा दहावीचा ९८ टक्के निकाल


शेख यासीन अन्सार, शेख मदीहा समशेर, शेख मोहंमद अफ्फान अन्सार

नगर – इकरा एज्युकेशन अ‍ॅण्ड वेल्फेअर सोसायटीच्या गोविंदपुरा येथील पी. ए. इनामदार इंग्लिश मीडियम स्कूलचा विद्यार्थ्यांनी यावर्षीही यशाची परंपरा कायम ठेवली. शाळेतील ११४ विधार्थांनी दहावीची परीक्षा दिली, त्यापैकी ११२ विद्यार्थी परीक्षेत उत्तीर्ण झाले. व दहावी बोर्डाच्या मार्च २०२५ च्या परीक्षेत शाळेचा निकाल ९८ टक्के लागला. यामध्ये शाळेचे विद्यार्थी शेख यासीन अन्सार याने ९२.६० टक्के गुण प्राप्त करून प्रथम क्रमांक मिळवला. तर द्वितीय शेख मदीहा समशेर ९१.४०, तृतीय शेख मोहंमद अफ्फान अन्सार ८८.६० टक्के गुण प्राप्त केले.

या यशाबद्दल कॉलेजचे प्राचार्य फिरोसअली मराक्कटील, उपप्राचार्या फरहाना शेख, संस्थेचे चेअरमन अब्दुल रहीम खोकर, व्हा.चेअरमन इंजि. इकबाल सय्यद, सचिव विकार काझी, खजिनदार डॉ. खालीद शेख, अ‍ॅकॅडमीक डायरेक्टर शब्बीर मोहंमद सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून कौतुक केले.

# रेणुका इंग्लिश मीडियम स्कूलचे उत्तुंग यश; दहावीच्या १००% निकालाची परंपरा कायम

नगर – नवनागापूर येथील रेणुका इंग्लिश मीडियम स्कूल या शाळेच्या विद्यार्थ्यांनी सलग सातव्या वर्षीही माध्यमिक शालांत परीक्षे मध्ये शंभर टक्के निकालाची उत्तुंग परंपरा कायम ठेवीत यश संपादन केले. या वर्षी शाळेचा विद्यार्थी करण योगेश उकीरडे याने ९५.६०% गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला तर स्मिता निरंजन पाटील हिने ९५.२०% गुण मिळवून द्वितीय तर सना इनामुल्लाह खान हिने ९५% गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळविला. २१ विद्यार्थी विशेष प्राविण्य श्रेणीत, ४ विद्यार्थी प्रथम श्रेणीत व २ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. यामध्ये २७ पैकी एकूण ११ विद्यार्थ्यांनी ९०% पेक्षा जास्त गुण मिळविले आहेत.

विद्यालयाचे अध्यक्ष इंजि. शुभम घाडगे, सचिव श्रीमती सुनंदा घाडगे, प्रशासकीय अधिकारी प्रा. वांढेकर सी.डी., विश्वस्त सौ. स्वाती थोरवे व सौ. अश्विनी कराळे, तसेच विद्यालयाच्या प्राचार्या सौ.विद्या बोराडे व सर्व शिक्षिकांनी व पालकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन व कौतुक केले.

# माऊंट सिनाय कॉन्व्हेन्ट स्कूलचा इयत्ता दहावीचा निकाल १०० टक्के

नगर – तालुक्यातील सारोळा बद्दी येथील माऊंट सिनाय कॉन्व्हेन्ट स्कूलचा इ.१० वी चा निकाल सलग चौथ्या वर्षी १०० टक्के लागला असून तेहरीन शेख हिने ८२.२० टक्के गुण मिळवून विद्यालयात प्रथम येण्याचा मान मिळवला. अरेबीया सय्यद व वैष्णवी म्हस्के यांनी अनुक्रमे ७८.६० व ७४.२० टक्के गुण मिळवून द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावला. विद्यालयाच्या वतीने सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचा मुख्याध्यापिका जयश्री खरात यांच्या हस्ते पेढा भरवून व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. या विद्यार्थ्यांना नेहा केदारे, रेणुका बानिया, उज्वला पंडित व कविता आढाव यांचे मार्गदर्शन लाभले.


दहावीच्या परिक्षेत यश मिळविणाऱ्या माऊंट सिनाय कॉन्व्हेन्ट स्कूलमधील विद्यार्थ्यांना पेढे भरवून व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करताना मुख्याध्यापिका जयश्री खरात.

यशस्वी विद्यार्थ्यांचे विद्यालयाचे संस्थापक डॉ. शाम खरात, विश्वस्त ज्योत्स्ना शिंदे, ज्योती हासे व राजेश चक्रे यांनी अभिनंदन केले आहे.




# गावांची विचित्र नावे

भारत हा विविधतेने नटलेला देश आहे. इथली संस्कृती, खाद्य संस्कृती, पोशाख, भाषा आणि परंपरेत प्रत्येक गोष्ट अनोखी आहे. मात्र देशात काही गोष्टी फारच विचित्र आहेत. यामध्ये गावांच्या विचित्र नावांचा समावेश होतो.

**गावाचं नाव ठरतं लाजिरवाणं**

नाव ही व्यक्ती किंवा गावाची ओळख असते; मात्र काही वेळा याच नावाची काहीवेळा लाज वाटते. देशातील काही गावांच्या बाबतीत हे तंतोतंत लागू पडतं. हरियाणा, उत्तर प्रदेश, राजस्थान आणि मध्य प्रदेशमधील अनेक गावांना विचित्र नावं देण्यात आली आहेत. या गावांमधील लोक अनेकदा गावांची नावं बदलण्याची मागणी करतात.

**हरियाणाताली 'गंदा' गाव**

हरियाणाच्या फतेहाबाद जिल्ह्यातील 'गंदा' गावाचे नाव ऐकताच लोक आश्चर्यचकित होतात. येथील एका विद्यार्थिनीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहून गावाचे नाव बदलण्याची मागणी केली होती. ती म्हणाली, ती कोणत्याही स्पर्धेत भाग घेण्यासाठी जाते आणि गावाचं नाव 'गंदा' असल्याचं सांगते तेव्हा लोक तिची चेष्टा करतात. यामुळे मुलांचं आणि तरुणांचं मनोबल खचतं.

**'कुतियांवाली' गाव**

हिसार जिल्ह्यातील 'कुतियांवाली' हे गावही या विचित्र नावासाठी चर्चेत आहे. गावाचं नाव बदलून 'वीरपूर' करण्याचा प्रस्ताव एकदा ग्राम पंचायतीने मांडला होता. पण अजून तरी हे नाव बदललेलं नाही. स्थानिक लोलोकांच्या मते 'कुतियांवाली' नावामुळे त्यांच्या मुलांना शाळेत चेष्टेला सामोरं जावं लागतं आणि लोक इतर ठिकाणीही त्यांना चिडवतात.

**'चोरगड' आणि 'कुत्ताबढ'**

हरियाणा आणि आजूबाजूच्या राज्यांमधलीही अनेक गावं विचित्र नावांमुळे नेहमी चर्चेत असतात. चोरगड हे नाव ऐकल्यावर हे गाव चोरांचा अड्डा असेल असं वाटतं. कुत्ताबढ हे नाव ऐकून बाहेरील लोक अनेकदा गोंधळून जातात. या सर्वच गावांची नावं आदरयुक्त आणि अभिमानास्पद असावीत अशी सगळ्या गावकऱ्यांची मागणी आहे.

**नावामुळे ओळख निर्माण होते पण...**

गावांच्या नावांशी लोकांच्या भावना जोडल्या गेल्या असतात; पण हेच नाव थट्टेचं कारण बनतं तेव्हा नावातील बदल आवश्यक ठरतो. नाव बदलण्याची प्रक्रिया सोपी नाही. यासाठी सरकारला ग्रामपंचायतीची शिफारस, सर्वसाधारण सहमती, जिल्हा दंडाधिकाऱ्यांचा अहवाल आणि शेवटी गृह मंत्रालयाची मान्यता घ्यावी लागते.

**इतिहासकार आणि सम ाजशास्त्रज्ञ काय म्हणतात?**

इतिहासकारांच्या मते, ही नावं वर्षानुवर्षं रुळलेली असतात. ही नावं कधीकाळी घडलेल्या एखाद्या विशिष्ट घटनेच्या, वांशिक गटाच्या, व्यवसायाच्या किंवा ठिकाणाच्या ओळखीवर आधारित असावीत.

**नाव बदलल्याने काय होईल?**

खरं तर नाव बदलल्याने गावाची स्थिती, विकास किंवा मूलभूत सुविधा यात काहीही बदल होणार नाही; पण सकारात्मक ओळख निर्माण करायची असेल आणि गावातील लोकांचा आत्म विश्वास वाढवायचा असेल तर बदल आवश्यक आहे. मुलांचं शिक्षण, नोकरीसाठी अर्ज आणि लग्न यासारख्या बाबींमध्ये नाव खूप महत्त्वाचं असतं. म्हणूनच गावांची नावं बदलण्याची मागणी केवळ भावनिक नसून सामाजिक आणि व्यावहारिक गरज बनली आहे.

# परग्रहावर जीवनाची शक्यता?

## कॅलिडोस्कोप

आपण या विश्वात एकटे आहोत का, हा प्रश्न मानवाला शतकानुशतके भेडसावत आहे. आता या रहस्यावरील पडदा हटताना दिसत आहे. पृथ्वीपासून सुमारे सातशे ट्रिलियन मैल अंतरावर असलेल्या 'के २-१८ ब' नावाच्या ग्रहावरून शास्त्रज्ञांना जीवन असल्याचे संकेत मिळाले आहेत.



हा ग्रह पृथ्वीपेक्षा अडीच पट मोठा असून केंब्रिज विद्यापीठातील शास्त्रज्ञांच्या पथकाकडून त्याच्या वातावरणाचा शोध घेतला जात आहे. 'के २-१८ ब'च्या वातावरणात शास्त्रज्ञांना डायमिथाइल सल्फाइड आणि डायमिथाइल डायसल्फाइड यासारखी रसायनं आढळली आहेत. पृथ्वीवर ही रसायनं सामान्यतः फक्त फायटोप्लँक्टन आणि बॅक्टेरिया सारख्या सजीवांद्वारेच तयार केली जातात. हे संकेत अद्याप अंतिम पुरावे मानले जाऊ शकत नाहीत; परंतु प्रमुख संशोधक प्रोफेसर निक्कू मधुसूदन यांच्या मते 'के २-१८ब' वर सजीवांची उपस्थिती शक्य असल्याचं पुढील एक - दोन वर्षात सिद्ध होऊ शकेल.

**समुद्राच्या अस्तित्वाचेही संकेत**

या ग्रहाच्या वातावरणात अमोनियाच्या अनुपस्थितीकडे शास्त्रज्ञांचं लक्ष वेधलं गेलं आहे. त्यांच्या मते 'के-२-१८ ब'वर एक प्रचंड महासागर असू शकतो. हा महासागर सगळा अमोनिया शोषून घेत असावा. अमोनियाची उपस्थिती जीवनाच्या अस्तित्वासाठी एक महत्त्वाचा संकेत असते. म्हणून त्याच्या अनुपस्थितीमुळे ग्रहावर महासागरासारख्या जीवनाला आधार देणाऱ्या संरचना असण्याची शक्यता वाढते. अर्थात तिथे पृष्ठभागाखाली लाव्हाचा महासागर असण्याचीही शक्यता नाकारता येत नाही. असं असल्यास ते जीवनासाठी प्रतिकूल असेल.

**अधिक अचूक माहिती गोळा करण्याचा प्रयत्न**

शास्त्रज्ञांना आतापर्यंत 'के२-१८ ब'च्या वातावरणातून 'थ्री-सिग्मा' पातळीची पुष्टी मिळाली आहे. 'सिग्मा' हे वैज्ञानिक अचूकता मोजण्याचं मानक आहे. सामान्यतः जीवनाच्या अस्तित्वाच्या ठोस पुराव्यासाठी 'पाच-सिग्मा' आवश्यक असतात. थ्री-सिग्मा पातळीवर आढळणारे संकेत या दिशेने एक मोठं पाऊल असलं तरी, वैज्ञानिक समुदायाला पूर्णपणे आश्वस्त करण्यासाठी अधिक अचूकता आवश्यक आहे. प्राध्यापक निक्कू मधुसूदन यांच्या मते 'के २-१८ब'वर जीवसृष्टी आढळली, तर ती केवळ एका ग्रहापुरती मर्यादित नसेल, तर या शोधामुळे संपूर्ण विश्वात जीवसृष्टीच्या व्यापक शक्यता उघड होतील. हा शोध केवळ विज्ञानाच्या दृष्टिकोनातूनच नव्हे तर मानवतेच्या भविष्याच्या आकलनासाठीही ऐतिहासिक मानला जाईल.

# बांगडी ४० हजार वर्षांपूर्वीची



बांगडी ४० हजार षांपूर्वीची शास्त्रज्ञांना एका गुहेत ४० हजार वर्षांपूर्वीची बांगडी सापडली आहे. या बांगडीची चमक बघून शास्त्रज्ञांनाही आश्चर्याचा धक्का बसला आहे. ही बांगडी खूप प्राचीन असल्याचं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे. सायबेरियातल्या डेनिसोवा गुहेत ही बांगडी सापडली आहे. इथेच एक लाख २५ हजार वर्षांपूर्वी लुप्त झालेल्या जनावरांची हाडंही सापडली होती. या भागात डेनिसोवा जमातीचे लोक रहात होते. त्यांच्यावरूनच या गुहेला डेनिसोवा हे नाव पडलं आहे. डेनिसोवन ही मानवाची एक प्रजाती होती. हे अनेक अर्थांनी वेगळे होते. जवळपास १० लाख वर्षांपूर्वी त्यांचं अस्तित्व होतं. शास्त्रज्ञांना डेनिसोवन महिलेची हाडं आणि दातही सापडले होते. डेनिसोवन्स जमातीचं सध्याच्या मानवजातीशी काहीच साधर्म्य नव्हतं. डेनिसोवन्स सध्याच्या मानवाजातीपेक्षा बरेच प्रगत आणि शक्तीशाली असल्याचंही बोललं जात होतं. दरम्यान शास्त्रज्ञांना सापडलेल्या या बांगडीवरची कलाकुसर खूपच अनोखी आहे. ही बांगडी बघितल्यावर त्या काळातल्या आधुनिक तंत्रज्ञानाची प्रचीती येते. या बांगडीमुळे काही नवे शोध लागायला मदत होणार आहे.



# रुग्णालयातच सजला मंडप

मध्य प्रदेशातील राजगड जिल्ह्यात एक अनोखा विवाहसोहळा पार पडला. इथे एक वर मिरवणुक घेऊन रुग्णालयात पोहोचला. त्याची वधू लग्नाच्या दिवशी आजारी पडली. आजारी वधूला वराने कडेवर घेतलं आणि सात फेरे घेतले. मग त्याने तिच्या कपाळावर कुंकू लावलं आणि तिच्याशी लग्न केलं.

सर्व लग्नविधी अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर पार पडले. या लग्नाचे साक्षीदार ठरलेल्या उपस्थितांनी वराचं खूप कौतुक केलं. बेवार इथल्या परम सिटी कॉलनीतील रहिवासी जगदीश सिंग सिकरवार यांचा पुतण्या आदित्य सिंग याचं कुंभराज इथल्या नंदिनीशी लग्न ठरलं होतं. हे लग्न ३० एप्रिले रोजी अक्षय्य तृतीयेच्या दिवशी कुंभराजजवळील पुरुषोत्तमपुरा गावात होणार होतं; पण लग्नाच्या ५ दिवस आधी, वधू नंदिनीची तब्येत अचानक बिघडली. २४ एप्रिल रोजी तिला बेवार शहरातील पंजाबी नर्सिंग होममध्ये दाखल करण्यात आलं.

**मुहूर्त आणि प्रेम**

नंदिनीची तब्येत बिघडत असल्याने डॉक्टरांनी तिला संपूर्ण विश्रांती घेण्याचा सल्ला दिला. कुटुंबातील सदस्यांनी अक्षय्य तृतीयेच्या शुभ मुहूर्तावर लग्न करण्याबद्दल विचारल्यावर वधू जास्त वेळ बसू शकणार नाही, असं डॉक्टरांनी सांगितलं. यानंतर, कुटुंबातील सदस्यांनी डॉक्टराशी बोलून रुग्णालयातच लग्न करण्याचा निर्णय घेतला. वराच्या मते त्या दिवशी लग्न झालं नसतं तर दोन पुढील वर्ष लग्नाचा मुहूर्त आला नसता.

**रुग्णालयात बांधलेला मंडप**

वधूशी लग्न करण्यासाठी आदित्य बँड घेऊन रुग्णालयात पोहोचला. तिथे वैदिक मंत्रांनी लग्नाचे सर्व विधी पार पडले. यावेळी नंदिनीला चालता येत नव्हतं. त्यामुळे, रुग्णालयातील सजवलेल्या मंडपात वधूला कडेवर घेऊन आदित्यने सात फेरे घेतले. या वेळी, रुग्णालयातच वराने वधूचा निरोप घेतला आणि तिला मंगळसूत्रही घातलं.



# हिऱ्याच्या पोटात सापडला हिरा

मध्यंतरी एका हिऱ्याचा शोध लावण्यात आला. या हिऱ्याच्या आत दुसरा हिरा सापडला. जगभरात हिऱ्याच्या बऱ्याच खाणी आहेत. या खाणींमधून बरेच हिरे बाहेर काढले जातात. पण असा हिरा पहिल्यांदाच सापडला आहे. हा हिरा ८० कोटी वर्षांपेक्षाही जुना असल्याचं बोललं जातं. यकुशियातल्या न्यूरबा खाणीत हा हिरा सापडला. हा ०.६२ कॅरेटचा हिरा असून त्याच्या पोटातल्या हिऱ्याचं वजन ०.०२ कॅरेट आहे. हा अनोखा हिरा प्रचंड महाग असून भारतीय चलनात त्याची किंमत ४२६ कोटी रुपये असल्याचं बोललं जात आहे. अलरोसा या खाण कंपनीने याबाबत माहिती दिली. अशा प्रकारचा हिरा पहिल्यांदाच सापडल्याचं त्यांचं म्हणणं आहे. एका हिऱ्याच्या पोटात दुसरा हिरा सापडणं हा निसर्गाचा एक चमत्कार असल्याचं त्यांचं म्हणणं आहे. असा हा महागडा हिरा सध्या चर्चेचा विषय ठरतो. आहे.



# दाढी बनली अडचण

पतीने दाढी करण्यास नकार दिल्याने पत्नी त्याला सोडून गेल्याचा विचित्र प्रकार समोर आला आहे. याहून धक्कादायक म्हणजे महिला पतीला सोडून दीरासह पळून गेली आहे. महिलेने मात्र दाढीमुळे पतीला सोडल्याचा दावा फेटाळून लावला आहे. याउलट तिने पती लैंगिकदृष्ट्या सक्षम नसल्याचं म्हटलं आहे. उत्तर प्रदेशच्या मेरठमध्ये ही घटना घडली.

सात महिन्यांपूर्वी मोहम्मद सगीरने अर्शीशी लग्न केलं. आयुष्यातील खास दिवस असल्याने सगीरने दाढीला चांगला आकार दिला होता; पण हीच दाढी आपल्या अयशस्वी वैवाहिक जीवनाचं कारण बनेल याची त्याला पुसटशीही कल्पना नव्हती.

**लग्नानंतर दाढीला आक्षेप**

लग्नानंतर काही दिवसांनी अर्शीने सगीरच्या दाढीवर आक्षेप घेण्यास सुरुवात केली. तिने सगीरकडे दाढी करण्यासाठी तगादा लावला. पण सगीरचं दाढीवर प्रचंड प्रेम आहे. त्यांच्यातील या मतांतराचं हळूहळू वादात रुपांतर झालं. यादरम्यान अर्शीचा जीव दीर साबीरवर जडू लागला कारण त्याला दाढी नव्हती. दोघांमध्ये प्रेमसंबंध निर्माण होऊ लागले आणि अखेर फेब्रुवारी महिन्यात दोघं पळून गेले.

**धाकट्या दीरासोबत पलायन**

सगीरने अर्शी परत येण्याची वाट पाहिली; पण तीन महिन्यानंतरही तिचा काहीच पत्ता लागला नाही. तेव्हा मात्र त्याने पोलिसात पत्नी बेपत्ता झाल्याची तक्रार दाखल केली. 'अर्शी नेहमी माझ्या दाढीबद्दल तक्रार करत असे. कुटुंबाच्या दबावाखाली तिने माझ्याशी लग्न केलं. ती माझ्या धाकट्या भावासोबत घर सोडून गेली. त्या दोघांमध्ये झालेल्या प्रेमाच्या गप्पांचं माझ्याकडे रेकॉर्डिंग आहे. त्यात ती त्यांचा मार्ग मोकळा करण्यासाठी माझ्या जेवणात विष मिसळण्याची किंवा मला मारण्यासाठी एखाद्याला सुपारी देण्याची योजना आखत होती,' असं सगीर म्हणाला. दरम्यान अर्शी दीरासह तिच्या आई-वडिलांच्या घरी पोहोचली होती. आपल्याला सगीरबरोबर राहायचं नसून साबीरशी लग्न करायचं असल्याचं तिने सांगितलं.

# विषारी मशरूम

मशरूम बरेच प्रसिद्ध आहेत. मशरूमपासून विविध पदार्थ तयार केले जातात. मशरूम म्हणजे अळंबी. बऱ्याच ठिकाणी मशरूमची शेती करून उत्पन्नही मिळवलं जातं. मशरूमचे अनेक प्रकार आहेत. मात्र शास्त्रज्ञांनी नुकताच मशरूमचा एक प्रकार शोधला आहे. मशरूमचा हा प्रकार खूपच विषारी आहे. त्यामुळे हे मशरूम आपण खाऊ शकत नाही. दुसरं म्हणजे या मशरूमना साधा हातही लावता येत नाही. जपान आणि दक्षिण कोरियामध्ये या मशरूममुळे अनेकांचा मृत्यूही झाला आहे. औषधी मशरूम असल्याचा समज झाल्याने काही लोकांनी हे मशरूम खाल्लं आणि त्यांना त्रास होऊ लागला. हे मशरूम खाल्ल्यानंतर माणसाचे विविध अवयव काम करणं बंद करतात. या मशरूममुळे मेंदूचंही नुकसान होऊ शकतं. या मशरूमला हात लावला तरी शरीरावर सूज येते. या मशरूमचं विष शरीरात शोषलं जातं आणि आपल्याला त्रास होतो. पोडोस्ट्रोमा कॉर्नू डामा नावाचं हे मशरूम १८९५ मध्ये चीनमध्ये आढळलं होतं. त्यानंतर इंडोनेशिया आणि पपुआ न्यू गिनीमध्येही ते आढळलं. त्यामुळे लोकांनी काळजी घ्यावी असं आवाहन केलं जात आहे.



# केशर भिडले गगनाला

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानाविरोधात काही महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. अटारी सीमा बंद करण्याचा निर्णय त्यापैकीच एक. साहजिकच पाकिस्तानमधून अटारी सीमेद्वारे भारतात येणाऱ्या सर्व वस्तूंच्या आयातीवर प्रतिबंध लावण्यात आला आहे. आता पाकिस्तानमार्गे भारतात येणाऱ्या केशराची आवक बंद झाल्यामुळे केशराचे भाव गगनाला भिडले आहेत. अटारी सीमा बंद केल्यानंतर केशराचा दर प्रति किलो ५ लाखांवर गेला आहे.

**केशर इतके महाग का ?**

भारतात होणाऱ्या केशराच्या आयातीवर परिणाम झाल्यामुळे त्याची किंमत झपाट्याने वाढत आहे. अटारी सीमा बंद झाल्यापासून, अफगाणिस्तानातून केशर आयात होत नाही. त्यामुळे अवघ्या ४ दिवसांत त्याच्या किंमतीत १० टक्क्यांची वाढ पाहिला मिळाली. माध्याममधील बातम्यांनुसार, दहशतवादी हल्ल्यानंतर उच्च दर्जाच्या केशरची किंमत ५ लाख रुपयांपेक्षा जास्त झाली आहे. हल्ल्यापूर्वी हीच किंमत ४.२५ लाख ते ४.५० लाख रुपयांच्या दरम्यान होती. अर्थात अवघ्या २ आठवड्यातच केशरच्या किमतीत किमान ५० हजार रुपयांची वाढ झाली आहे.

समुद्रसपाटीपासून १८०० मीटरपेक्षा जास्त उंचीवर पिकवला जाणारा केशर हा एकमेव मसाला आहे.

**काश्मीरमध्ये किती केशर उत्पादन?**


केशराचा पुरवठा पुरेसा होत नसल्यामुळे किरकोळ आणि घाऊक विक्रेत्यांना अडचणी येत आहेत. विशेषतः उच्च दर्जाचं केशर पाकिस्तानमार्गे भारतात येत होतं. भारतात दरवर्षी सुमारे ५५ टन केशर वापरलं जातं. त्यापैकी ६ ते ७ टन केशराचं उत्पादन काश्मिरमध्ये होतं.

त्यामुळे उर्वरित गरज पूर्ण करण्यासाठी आपल्याला आयातीवर अवलंबून राहावं लागतं. ही आयात अफगाणिस्तान आणि इराणमधून केली जाते. अफगाणिस्तानातील केशर रंग आणि सुगंधासाठी प्रसिद्ध आहे, तर इराणमधून येणारं केशर तुलनेत कमी किमतीचं असतं. काश्मीरमधील पुलवामा, श्रीनगर, पंपोर, बडगाम आणि जम्मूमधील किश्तवाड भागात केशराची लागवड केली जाते.

**इराणी केशराच्या वाढलेल्या किमती**

अफगाणिस्तानातून पुरवठा थांबल्यामुळे इराणी केशराच्या किमतीतही पाच टक्क्यांची वाढ झाली आहे. बाजारात साधारणपणे केशराचे तीन मुख्य प्रकार उपलब्ध आहेत.

* **मोंगरा (काश्मिरी):** गडद लाल रंग, चविष्ट आणि सर्वाधिक किंमत
* **लाचा (काश्मिरी):-** मोंगरासारखंच पण कमी स्ट्राँग.
* **पुशल (अफगाण, इराणी)-** हलक्या रंगाचं, थोडं पिवळं, अधिक परवडणारं



# महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्तांचे खासगी संस्थेमार्फत ५३ टक्के सर्वेक्षण पूर्ण

## मालमत्तांच्या नवीन मोजमापांमुळे क्षेत्रफळात सुमारे ३० टक्क्यांनी वाढ; जुलैअखेर सर्वेक्षण पूर्ण करण्याचे निर्देश : आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे

नगर – अहिल्यानगर शहर महानगरपालिका हद्दीतील सर्व मालमत्तांचे महानगरपालिकेमार्फत सर्वेक्षण सुरू आहे. याद्वारे महानगरपालिका क्षेत्रातील सर्व जागा व मालमत्तांची, इमारतींची, घरांची नव्याने मोजमापे घेऊन मूल्यांकन करण्यात येत आहे. सद्यस्थितीत ५३ टक्के काम पूर्ण झाले असून, मालमत्तांचे क्षेत्रफळ सुमारे ३० टक्क्यांनी वाढले आहे. जुलै अखेरपर्यंत हे काम पूर्ण करण्याचे निर्देश ठेकेदार संस्थेला देण्यात आले आहेत. दरम्यान, नागरिकांनी सर्वेक्षण करणाऱ्या खासगी संस्थेच्या कर्मचाऱ्यांना सहकार्य करावे. त्यांच्याकडे ओळखपत्र असून ते तपासून त्यांना सर्वेक्षणासाठी सहकार्य करावे, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी केले आहे.

यशवंत डांगे यांनी महानगरपालिकेत सर्वेक्षणाचा आढावा घेतला. शहरात १३२६३७ मालमत्ता असून त्यापैकी ७०६१० मालमत्तांचे सर्वेक्षण पूर्ण झाले आहे. त्याद्वारे मालमत्तांच्या क्षेत्रफळात सुमारे २५ ते ३० टक्के वाढ झाली आहे. परिणामी, मालमत्ता कराच्या मागणीतही वाढ होणार आहे. महानगरपालिका हद्दीतील सर्व जमीन व इमारती यांचे सर्वेक्षण करुन आवश्यक माहिती संकलीत करणे, मुल्यांकन व आवश्यक तांत्रीक सेवा संगणकीकरण करण्यात येणार आहे. मालमत्तेची डिजीटल छायाचित्रे, जिओ टॅगींग, तसेच मालमत्तेच्या अंतर्गत मोजमापांसाठी, त्यांचे कारपेट व बिल्टअप क्षेत्र डीजीटल उपकरणाद्वारे मोजण्यात येणार आहे. महानगरपालिकेचे वसुली लिपिक व मे. सी. ई. इन्फो सिस्टीम लिमिटेड यांच्या प्रतिनिधीच्या उपस्थितीत हे काम केले जात आहे. त्यासाठी वसुली लिपिक व वसुली मदतनीस आदींची नियुक्ती करण्यात आली आहे.

खासगी संस्थेचे कर्मचारी असल्याने काही नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण होऊन सर्वेक्षणात अडथळे येत आहेत. मालमत्ताधारकांनी मालमत्ता सर्वेक्षणासाठी येणाऱ्या कर्मचाऱ्यांची ओळख तपासून त्यांना सहकार्य करावे. त्यांना आवश्यक ती माहिती द्यावी. सर्वेक्षणाचे काम हे अहिल्यानगर महानगरपालिका विनामुल्य करत असून यासाठी कुठलेही शुल्क आकारण्यात येणार नसल्याचे महानगरपालिका प्रशासनाने स्पष्ट केले आहे. सर्वेक्षणामुळे सर्व मालमत्तांना कर आकारणी होईलच. मात्र, यामुळे मालमत्ताधारकांना आवश्यक असलेल्या मुलभुत सुविधांमध्ये सुधारणा करणे शक्य होणार आहे. या सर्व्हेक्षणाबाबत अथवा सर्वेक्षण कामास येणाऱ्या कर्मचारी, प्रतिनिधींबाबत कुठलीही तक्रार असल्यास amc_anr@rediffmail.com व amc.revision2@gmail.com या ई–मेल आयडी वर तक्रार करावी. याबाबत सहाय्यक मूल्य निर्धारक कर संकलन अधिकारी विनायक गंगाधर जोशी यांच्याशी ९८२२०७६८६५ या मोबाईल क्रमांकावर संपर्क करता येईल, असेही यशवंत डांगे यांनी म्हटले आहे.

# निंबळक रेल्वे क्रॉसिंग गेट येथे उड्डाणपुलाच्या कामाचा सर्व्हे सुरु

## एमआयडीसीतील कामगारांसह अनेक गावच्या नागरिकांना मिळणार दिलासा

नगर – निंबळक रेल्वे क्रॉसिंग गेट येथे उड्डाणपुलाच्या कामाचा अंतिम सर्व्हेसाठी सुरुवात करण्यात आली आहे. त्यामधे मोजमाप घेऊन खुणा करण्यात आल्या. सर्वेसाठी ठेकेदार कंपनीचे अधिकारी तसेच रेल्वे अधिकारी उपस्थित होते. यानंतर ड्रोन सर्व्हे करण्यात येऊन अंतिम रेखांकन करण्यात येईल व प्रत्यक्ष डिझाइन करण्यात येईल. त्यामुळे लवकरच या कामाला मुहूर्त लागणार आहे.

सन २०१७ पासून येथील रेल्वेगेट वर उड्डाणपुल करण्यात यावा यासाठी पं.स.चे माजी उपसभापती डॉ.दिलीप पवार यांनी विशेष पाठपुरावा केला. सोबत बी.डी.कोतकर, दत्तात्रय दिवटे, दत्तूअण्णा कोतकर, शिवाजी दिवटे, दत्ता कोतकर, दत्ता गुलाब कोतकर, संदिप कोतकर, विकास घोलप, निलेश पाडळे इतर ग्रा.पं.सदस्य व ग्रामस्थांनी वेळोवेळी रेल्वे अधिकाऱ्यांचा माध्यमातून रेल्वे मंत्रालयाकडे पाठपुरावा केला होता. त्यास प्रतिसाद देत जानेवारी २०२५ मध्ये रेल्वे मंत्रालयाने पत्र पाठवत या कामासाठी १०० टक्के निधीची तरतूद करत लवकरच प्रक्रिया पूर्ण करण्याचे कळविले होते. त्यामुळे राज्य शासनाने ह्यातील निम्मी रक्कम खर्च करण्याचा अडसर दूर झाला होता.

रेल्वे मंत्रालयाच्या पत्रानंतर सुद्धा हे काम सुरु होईल की नाही ह्याबद्दल ग्रामस्थामधे साशंकता होती. मात्र आता अंतिम सर्व्हे साठी सुरुवात झाल्याने फक्त निंबळकच नव्हे तर एम.आय.डी.सी. मधील हजारो कामगारांचा महत्वाचा प्रश्न मार्गी लागत आहे. या रस्त्यावर नगर शहर, नगर तालुका, पारनेर तालुक्यातील अनेक गावातील लोक प्रवास करत असतात तसेच सूपा एम.आय.डी.सी.मधून इकडे येणारे अनेक लोक याच रस्त्याने प्रवास करतात. रेल्वे गेट बंद असल्यावर रूग्ण अडचणीत सापडतात, वाहतूक कोंडी अशा अनेक समस्या येतात. लवकरच या समस्येतुन सुटका होऊन वर्षअखेर पर्यंत कामास सुरुवात होईल. सर्वांच्या सहकार्याने जनतेचे स्वप्न साकार होत असताना मनस्वी आनंद होत आहे. आता उद्योग व्यवसाय व आर्थिक उलाढाल वाढेल. असे माजी उपसभापती डॉ.दिलीप पवार यांनी सांगितले.

# देवदर्शनाकरिता बाहेरगावी गेलेल्या कुटुंबाच्या घरी भरदिवसा चोरी; दागिने व रोकड पळविली

नगर – नाशिक येथे देवदर्शनाकरिता गेलेल्या कुटुंबाच्या बंद घराच्या दरवाजाचे कडी, कोयंडा, कुलूप तोडून अज्ञात चोरट्यांनी आतील सोन्या चांदीचे दागिने व रोख रक्कम असा सुमारे ६७ हजार रुपये किमतीचा ऐवज चोरुन नेला. ही घटना सावेडी परिसरातील बालिकाश्रम रोडवरील ताठे मळा येथे ११ मे रोजी सकाळी ९ ते रात्री ८.३० वाजण्याच्या दरम्यान घडली.

याबाबत निलम गणेश क्षीरसागर (वय ३७, रा. सियाराम बिल्डिंग फेज २, ताठेमळा, बालिकाश्रम रोड) यांनी १३ मे रोजी दुपारी तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या फिर्यादीत म्हटले आहे की क्षीरसागर कुटुंब हे ११ मे रोजी सकाळी ९ वाजता देवदर्शनाकरिता नाशिक येथे गेले होते. नाशिकहून रात्री ८.३० च्या सुमारास नगरकडे येत असताना प्रवासादरम्यान त्यांना शेजारी राहणारे निशांत कासार यांचा फोन आला व त्यांनी सांगितले की बिल्डिंगमध्ये चोरी झाली असून तुमच्या फ्लॅटचे कुलूप तुटलेले दिसत आहे.

फिर्यादी हे रात्री १०.३० वाजण्याच्या सुमारास घरी आले असता त्यांना त्यांच्या घराचा दरवाजाचे कडी कोयंडा तुटलेला दिसला. आतील हॉल व बेडरूममधील साहित्य अस्ताव्यस्त पडलेले दिसले. कपाटातही उचकापाचक झालेली दिसली. क्षीरसागर यांनी कपाटाची पाहणी केली असता कपाटातील १ तोळा वजनाच्या चार सोन्याच्या अंगठ्या, ४ ग्रॅम वजनाचे कानातील टॉप्स, १ ग्रॅम वजनाचा सोन्याचा कॉइन, ८० ग्रॅम वजनाचे चांदीचे पूजेचे साहित्य, ३ हजार रुपये रोख रक्कम अशा ऐवज चोरट्यांनी चोरुन नेल्याचे निदर्शनास आले. याप्रकरणी निलम क्षीरसागर यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन तोफखाना पोलिसांनी अज्ञात चोरट्यांच्या विरुद्ध घरफोडीचा गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास महिला पोलीस हवालदार प्रमिला गायकवाड या करीत आहे.



मौजे पिंपळगाव माळवी येथील माजी उपसरपंच लताबाई नानाभाऊ कराळे यांची निर्घृण हत्या करणाऱ्या मारेकऱ्यांचा तपास लावून तात्काळ अटक करण्याच्या मागणीसाठी शिव प्रहार संघटना व पिंपळगाव माळवीचे ग्रामस्थ पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर उपोषणास बसले आहेत.

# हत्येचा तपास लावून आरोपींना तात्काळ अटक करण्यासाठी पीडित कुटुंबियांचे पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर 'उपोषण'

नगर – मौजे पिंपळगाव माळवी येथील माजी उपसरपंच लताबाई नानाभाऊ कराळे यांची निर्घृण हत्या करणाऱ्या मारेकऱ्यांचा तपास लावून तात्काळ अटक करण्याच्या मागणीसाठी शिव प्रहार संघटनेच्यावतीने व पिंपळगाव माळवीच्या ग्रामस्थांच्यावतीने पोलीस अधीक्षक यांची भेट घेऊन निवेदन देण्यात आले होते. मात्र अद्यापही कुठल्याही प्रकारची कारवाई करण्यात आली नसल्याने जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर उपोषण करताना शिव प्रहार संघटनेचे युवक तालुकाप्रमुख गोरक्षनाथ आढाव, मंगल वाघ, जाई पवार, अश्विनी आढाव, सविता जाधव, कल्याणी रायकर, स्वाती गुंड, रेशमा पठाण, हिराबाई तरवडे, शितल वाघ, सविता बाबर, वैशाली वाय, ज्योती वाघ, वर्षा वाघ, वैशाली गुंड, वर्षा प्रभुणे, वंदना प्रभुणे, तलेजा बोरुडे, जय जाधव, सुजाता जाधव, सुरेखा प्रभुणे आदीसह ग्रामस्थ उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे की, मौजे पिंपळगाव माळवी येथील माजी उपसरपंच कै. लताबाई नानाभाऊ कराळे यांची १३ फेब्रुवारी २०२५ रोजी दुपारी हत्या करण्यात आलेली आहे. हत्येला ३ महिने उलटूनदेखील कुठल्याही प्रकारचा तपास लागलेला नाही. अंत्यविधीच्या वेळी एमआयडीसी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक चौधरी यांनी आश्वासन दिले होते. दोन दिवसात तपास लाऊ मात्र तीन महिने होऊन देखील कुठल्याही प्रकारचे आरोपी सापडले नाही. त्यामुळे मौजे पिंपळगाव माळवी येथील महिला व ग्रामस्थ भयभीत झालेले आहे. तसेच गावांमध्ये पोलीस प्रशासना विरोधात ग्रामस्थांचा असतोष निर्माण झाला आहे. हा तपास पोलीस यंत्रणेंनी गहाळ केला की काय? अशी उलट सुलट चर्चा पिंपळगाव माळवीसह परिसरातील गावांमध्ये चालू आहे. त्यामुळे पोलीस अधीक्षक यांनी लवकरात लवकर या घटनेचा तपास लावून आरोपींना अटक करण्याच्या मागणीसाठी शिव प्रहार संघटना व मौजे पिंपळगाव माळवी ग्रामस्थ पीडित कुटुंबीयांसह बेमुदत आमरण उपोषण चालू केले आहे.

# कपड्याच्या दुकानात नोकरानेच केली १ लाख २० हजाराची चोरी

नगर – शहरातील कपड्याच्या दुकानात दिवसभरातील व्यवहाराची रक्कम काउंटरवर जमा न करता काम १ लाख २० हजारांची रोकड घेवून दुकानातील नोकर पसार झाल्याची घटना अप्पू हत्ती चौक येथील मूलचंद मिल या दुकानात ९ मे रोजी घडली आहे. या प्रकरणी कामगार विक्रम बाळासाहेब जगताप (रा. गोदेगाव, ता. श्रीरामपूर. हल्ली रा. दातरंगे मळा, दिल्ली गेट) याच्या विरुद्ध तोफखाना पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत मूलचंद मिलचे स्टोअर मॅनेजर वशिष्ठ साहेबराव सुरवसे (वय ३४, रा. मिसाळ गल्ली, सर्जेपुरा, अ.नगर) यांनी १३ मे रोजी सायंकाळी तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांनी दुकानातील हेड कॅशियर गांधी यांना रुटींगप्रमाणे ९ मे रोजी सकाळी १० ते रात्री १० वाजेपर्यंत दुकानात जमा झालेल्या सर्व काउंटर कॅशची टॅली करण्यास सांगितले असता गांधी यांना त्यामध्ये १ लाख २० हजार रुपये कमी असल्याचे दिसले. याबाबत फिर्यादी यांनी विचारपूस केली असता दुकानात काम करणारा विक्रम जगताप हा कामावर आला नसल्याचे समजले.

सुरवसे यांनी विक्रम जगताप यांच्या राहत्या घरी जाऊन पाहिले असता तो घरी मिळून आला नाही तसेच त्याच्या घराला कुलूप लावलेले दिसले. जगताप याच्या मोबाईलवर वारंवार संपर्क केला असता त्याचा फोन बंद लागत होता. यावरुन फिर्यादी यांची खात्री झाली की विक्रम जगताप याने दुकानातील कॅश काउंटरमध्ये जमा होणाऱ्या रकमेपैकी १ लाख २० हजार रुपये चोरून नेले. ३–४ दिवस त्याचा शोध न लागल्याने अखेर वशिष्ठ सुरवसे यांनी १३ मे रोजी सायंकाळी तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. या फिर्यादीवरून पोलिसांनी विक्रम जगताप यांच्याविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

# बसस्थानकातून प्रवासी महिलेच्या दागिन्यांची चोरी

नगर – एसटी बसमधून बसस्थानकात उतरताना प्रवाशांच्या झालेल्या गर्दीचा फायदा घेऊन दोन अनोळखी महिलांनी प्रवासी महिलेच्या बॅग मधील १ तोळा वजनाचे सोन्याचे नेकलेस चोरुन नेले. ही घटना स्वास्तिक चौक येथील पुणे बसस्थानक येथे १३ मे रोजी दुपारी ४.३० वाजण्याच्या सुमारास घडली.

याबाबत सुनंदा अरुण भारस्कर (वय ३५, रा. बाबा हॉस्पिटल, दीप बंगला चौक, शिवाजीनगर, पुणे) यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी या एमआयडीसी येथे नातेवाईकांच्या लग्नाकरिता पुणे ते अहिल्यानगर एसटी बसने प्रवास करीत असताना त्यांनी त्यांच्याकडील १ तोळा वजनाचे सोन्याचे पट्टी नेकलेस काढून बॅगमध्ये ठेवले होते. दुपारी ४ वाजण्याच्या सुमारास एसटी बस पुणे बसस्थानक अ.नगर येथे आली असता बसमधून उतरत असताना झालेल्या गर्दीत पाठीमागील दोन महिला त्यांना पुढे चला पुढे चला असे म्हणत होत्या. त्यातील एका महिलेच्या अंगात पोपटी पंजाबी ड्रेस व तोंडाला काळ्या पांढऱ्या रंगाचा स्कार्फ बांधलेला होता. तिच्यासोबत असलेल्या महिलेने संपूर्ण शरीरभर काळ्या रंगाचा बुरखा घातलेला होता. फिर्यादी यांनी मागे पाहिले असता एक महिला त्यांच्या बॅगची चेन लावताना दिसली. यावर फिर्यादी यांनी त्या महिलेस पकडण्याचा प्रयत्न केला असता त्या हाताला हिसका देवून कुठेतरी निघून गेल्या. फिर्यादी यांनी बॅगेची पाहणी केली असता बॅगमध्ये असलेले १ तोळा वजनाचे सोन्याचे नेकलेस या महिलांनी चोरून नेल्याचे दिसून आले.

याप्रकरणी कोतवाली पोलीस पोलिसांनी सुनंदा भारस्कर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून दोन महिलांविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल केला पुढील तपास महिला पोलीस नाईक साळवे या करीत आहे.

# दुकानावरील पाटी काढल्याच्या रागातून सत्तूर व चाकूने वार

## पांचपीर चावडी परिसरातील घटना, चौघांच्या विरुद्ध गुन्हा दाखल

नगर – दुकानावरील पाटी काढल्याचा राग आल्याने चौघांनी एकास शिवीगाळ करुन सत्तूर, चाकू, लाकडी दांडके व लाथाबुक्क्यानी बेदम मारहाण केल्याची घटना पांचपीर चावडी येथील कबाड गल्ली येथे १२ मे रोजी सायंकाळी ७ वाजण्याच्या सुमारास घडली.

या मारहाणीत ताहीर शेख अब्दुल कादर (वय ४१, रा. पंचवीर चावडी कबाडगल्ली अ.नगर) हे जखमी झाले आहेत. त्यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, फिर्यादी हे शौकत पटेल यांच्या बिल्डिंग खाली कसाई गल्ली येथे उभे असताना सकलेन असिफ वस्ताद, साहिल असिफ वस्ताद, मतीन अब्दुल वस्ताद, उनेस अबिद वस्ताद (सर्व रा. कसाई गल्ली, पांचपीर चावडी) हे तेथे आले व फिर्यादी यास तू आमच्या दुकानाची पाटी का काढली, असे म्हटले असता फिर्यादी याने तुमची पाटी माझे दुकानावर होती म्हणून ती काढून व्यवस्थित ठेवली आहे, असे सांगितले.

त्यावेळी सकलेन याने त्यांना शिवीगाळ केली. त्यास शिवीगाळ करु नको असे म्हटल्याचा राग आल्याने सकलेन याने सत्तूरने फिर्यादीच्या हातावर वार केला. साहिल याने चाकूने फिर्यादीच्या डाव्या हाताच्या दंडावर मारले व अन्य दोघांनी लाकडी दांडकेने मारहाण केली व आमच्याशी नडला तर तुझा कांडच करुन टाकतो अशी धमकी दिली. यावेळी योबीन शेख, तुफैल शेख हे फिर्यादीस सोडवण्याकरता आले असता त्यांना पाहून चौघे मारेकरी तिथून पळून गेले. त्यांनी जखमी ताहीर शेख यास उपचाराकरिता सिव्हिल हॉस्पिटल येथे दाखल केले. याप्रकरणी ताहीर शेख यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन चौघविरुद्ध भा न्या सं ११८ (१), ११५ (२), ३५२, ३५१ (२), ३ (५) प्रमाणे मारहाणीचा गुन्हा दाखल केला अधिक तपास महिला पोलीस हवालदार निता अडसरे या करीत आहे.

# श्रीरामकृष्ण फाउंडेशनच्या विद्यालयाची दहावीच्या १००% निकालाची परंपरा कायम



पृथा भोयटे ऋतु वाघ वैष्णवी बाहिर

नगर – श्रीरामकृष्ण एज्युकेशन फाउंडेशन ची सेठ नंदलाल धूत इंग्लिश मीडियम स्कूल आणि मोहनलाल रामअवतार मानधना कनिष्ठ महाविद्यालयाने १००%. निकालाची परंपरा कायम राखली. यावर्षीच्या २०२४–२५ च्या बोर्डाच्या परीक्षेला शाळेतील एकूण ७३ विद्यार्थी बसले होते. त्यापैकी ३३ विद्यार्थी विशेष योग्यतेमध्ये पास झाले. तर प्रथम श्रेणीत २५ विद्यार्थी व द्वितीय श्रेणीत १५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. विद्यालयात पृथा धनसिंग भोईटे ही ९२.८० टक्के गुण मिळवून प्रथम, तसेच वैष्णवी विलास बहिर ९१.०० टक्के गुण मिळवून द्वितीय व रितू नितीन वाघ ९१.८० टक्के गुण मिळवून तृतीय आली. विद्यालयात विज्ञान आणि तंत्रज्ञान या विषयात वैष्णवी विलास बहिर ९२ गुण प्राप्त करून प्रथम, तसेच वैष्णवी विलास बहिर, पियुष सुनील धस, ऋतुजा राहुल भिंगारदिवे, वर्का माजिद सय्यद हे विद्यार्थी इंग्रजीमध्ये ८७ गुण प्राप्त करून प्रथम व हिंदी संस्कृत व मराठी या विषयामध्ये पृथा धनसिंग भोईटे हि ९१ गुण मिळवून प्रथम आली. गणित विषयामध्ये वैष्णवी विलास बहिर हि ९६ गुण मिळवून प्रथम आली, तसेच इतिहास नागरीक शास्त्र भूगोल यामध्ये पृथा धनसिंग भोईटे हि ९६ गुण मिळवून प्रथम आली.

विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष श्रीगोपाल धूत संस्थेचे, उपाध्यक्ष व शालेय समितीचे अध्यक्ष नंदकुमार झंवर, संस्थेचे उपाध्यक्ष मोहनलाल मानधना व राजेश झंवर, सचिव डॉक्टर शरद कोलते, सहसचिव बजरंग दरक, तसेच सर्व पदाधिकारी, प्राचार्या सौ. राधिका जेऊरकर, उपप्राचार्या संपदा देशपांडे, समन्वयक सुषमा उजागरे व श्रेयकुमार गुंडू तसेच सर्व शिक्षक वृंद यांनी अभिनंदन केले.

# वकिलाची बदनामी करणाऱ्यावर गुन्हा दाखल

नगर – वकिलाचे चारित्र्यहनन करणारा मेसेज त्यांच्या जावयाच्या मोबाईलवर पाठवून बदनामी करणाऱ्याविरुद्ध कोतवाली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत ॲड. सुमतीलाल शांतीलाल बलदोटा (रा. माणिकचौक, नगर) यांनी फिर्याद दिली आहे. आरोपी नवरतन दीपक वर्मा (रा. पाटील कॉलनी, केडगाव) याने बलदोटा यांच्या जावयाच्या मोबाईलवर मेसेज पाठवून 'तुमचे सासरे चरित्रहीन आहेत, वाईट चालीचे आहेत, त्यांना समजून सांगा नाहीतर त्यांचे नुकसान होईल, त्यांना भविष्यात फार जड जाईल' अशी धमकी देऊन बदनामीकारक मजकूर पाठविला असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. या फिर्यादीवरून पोलिसांनी वर्मा यांच्या विरोधीत अदखलपात्र गुन्हा दाखल केला आहे.

# श्री समर्थ विद्या मंदिर प्रशालेची उज्वल यशाची परंपरा कायम




सावेडीतील श्री समर्थ विद्या मंदिर प्रशाला माध्य. व उच्च माध्य. विभाग कनिष्ठ महाविद्यालयाचा इ. १२ वी (उच्च माध्य.) शालांत परीक्षेचा शास्त्र शाखेचा सरासरी निकाल ९७. ७०% व शालांत परीक्षेत सावेडीतील श्री समर्थ विद्या मंदिर प्रशालेच्या विद्यार्थ्यांसमवेत शालेय समिती चेअरमन ॲड. किशोर देशपांडे, संस्थेचे व्हाईस चेअरमन श्रीपाद कुलकर्णी, संस्थेचे सचिव सुरेश क्षीरसागर, प्रशालेच्या प्राचार्य तथा मुख्याध्यापिका संगीता जोशी, पर्यवेक्षक सुनील कानडे व शिक्षकवृंद आदी. (छाया– उदय जोशी)

नगर – सावेडीतील श्री समर्थ विद्या मंदिर प्रशाला माध्य व उच्च माध्य विभाग कनिष्ठ महाविद्यालयाचा इ. १२ वी (उच्च माध्य) शालांत परीक्षेचा शास्त्र शाखेचा सरासरी निकाल ९७. ७०% व फेब्रुवारी २०२५ घेण्यात आलेल्या शालांत परीक्षेत सावेडीतील श्री समर्थ विद्या मंदिर प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन करत नेत्रदीपक यश मिळवले आहे प्रशालेचा निकाल ९८.६२ टक्के लागला आहे.

बारावी शास्त्र शाखेची विद्यार्थीनी कु. नभा कुलकर्णी हिने ८०.७६ टक्के गुण मिळवून विद्यालयात प्रथम क्रमांक, कु. कृष्णाली रापेल्ली हिने ७६.५० टक्के गुण मिळवून विद्यालयात व्दितीय क्रमांक, चि.मयंक मुळे याने ७४.६७ टक्के गुण मिळवून विदयालयात तृतीय क्रमांक मिळवला.

बारावी परीक्षेत महाविद्यालयाचे २ विद्यार्थी विशेष प्राविण्य प्रथम श्रेणीत एकूण २१ विद्यार्थी प्रथम श्रेणीत एकूण ५५ विद्यार्थी व्दितीय श्रेणीत तर ७ विद्यार्थी उत्तीण श्रेणी मिळून उत्तीर्ण झाले. सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे संस्थेतर्फे कौतुक करण्यात आले.

श्री समर्थ विद्या मंदिर प्रशाला उच्च माध्यमिक विभागात विद्यार्थ्यांसाठी शास्त्र शाखेत प्रवेश घेताना आयटी व इलेक्ट्रॉनिक्ससारखे व्यावसायिक अभ्यासक्रमाचे विषय उपलब्ध आहेत या विषयासाठी तसेच इतर शास्त्र शाखेतील भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र या विषयासाठी सुध्दा प्रशस्त सुसज्ञ अशा स्वतंत्र प्रॅक्टिकल लॅब उपलब्ध आहेत. प्रशालेत विद्यार्थ्यांना शिकविण्याकरीता पदव्युत्तर व अनभुवी शिक्षक आहेत. प्रशालेतील माध्य. व उच्च माध्य. विभागाच्या विद्यार्थ्यांसाठी प्रशस्त अशी नवीन इमारत बांधण्याचे काम प्रगतीपथावर आहे. या नवीन इमारतीत विद्यार्थ्यांना अधिकाधिक अद्ययावत तसेच तांत्रिकदृष्ट्या परीपूर्ण सोयी पुरवण्यात येणार आहेत.

प्रथम क्रमांक : कु. श्रावणी धनेश्वर व कु. स्नेहल म्हस्के ९७.६०%, व्दितीय : कु. मुग्धा कुलकर्णी ९७.२०%, तृतीय : चि. आदेश ताठे ९७%, पाच विद्यार्थ्यांना पूर्ण संस्कृत विषयात १०० पैकी १०० गुण मिळाले आहेत.

प्रशालेच्या या यशाबद्दल संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक केले आहे. या कौतुक सोहळ्यास शालेय समिती चेअरमन ॲड. किशोर देशपांडे, संस्थेचे व्हाईस चेअरमन श्रीपाद कुलकर्णी, संस्थेचे सचिव सुरेश क्षीरसागर आदींनी विद्यार्थ्यांचे पेढा भरून कौतुक केले. प्रशालेच्या प्राचार्य तथा मुख्याध्यापिका संगीता जोशी, पर्यवेक्षक सुनील कानडे व शिक्षक अरुण राशिनकर, सौ. अनुराधा शास्त्री, सारिका बोठे आणि प्रशालेचे सर्व शिक्षक सेवक वृंद या सर्वांचे संस्थेने अभिनंदन केले आहे.

११वी साठी आपल्याच उच्च माध्यमिक विभागात प्रवेश घेण्याचे आवाहन केले आहे.

